सुवर्णमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

स्थापना : १९६४

५०

ब्रह्मतेजो बलंबलम्

वर्ष ८ वे : अंक ५

ऑगस्ट २०२२

# मासिक नवस्नेह

स्वागतमूल्य ₹. 30/-

अमृत महोत्सवी स्वातंत्र्याचे
वर्ष आगळे
गजाननाच्या आगमनाचे
भव्य सोहळे
लोकमान्यांच्या स्मृतीस द्यावा
पुन्हा उजाळा
रंग राखीचे मनगटावरी
निळे जांभळे

– प्राजू





प्रेषक
**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**
४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ,
मंगळवार पेठ, कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

।। श्री परशुराम प्रसन्न ।।

# कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर

428, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर-416 012 फोन नं. 0231-2546225, 2991673, 7620546225

आता कोल्हापूर चित्पावन संघाच्या नवीन वेबसाईटवर घरबसल्या सर्व ब्राह्मण पोटशाखेतील विवाहेच्छू तरुण तरुणींसाठी हजारो स्थळे पाहून आपल्या अनुरूप जोडीदाराची निवड करता येणार ! सर्व ब्राह्मण वधुवरांसाठी ही मोठी सुवर्णसंधीच म्हणावी लागेल!

- देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे, कण्व, सारस्वत, देवरुखे, दैवज्ञ इ. सर्व ब्राह्मण पोटशाखांतील वधुवरांसहित मराठी, गुजराथी, कानडी व परप्रांतीय फक्त ब्राह्मण वधुवरांची घरबसल्या केव्हाही, कधीही आणि कितीही स्थळे पहाण्याची सोय !
- मोबाईलवर अधिकृत ॲपद्वारा वेबसाईट पाहण्याची सोय !
- अत्यंत गोपनीय व सुरक्षित वेबसाईट, सहज सोप्या पद्धतीने फॉर्म भरण्याची सुविधा !
- केवळ स्थानिकच नव्हे, तर संपूर्ण देशातील आणि जगभरातील ब्राह्मण वधुवरांची नोंदणीकृत स्थळांची माहिती उपलब्ध !
- आकर्षक तीन सवलत योजनेत विवाहेच्छूंसाठी ही पॅकेज उपलब्ध आहेत.

१) **श्री परशुराम पॅकेज :- स्वागत शुल्क रु. २,०००/- (एक वर्षासाठी)**
या पॅकेजमध्ये तुम्हाला एक वर्ष ऑफलाईन व एक वर्ष इंटरनेट नोंदणी मिळेल. यामध्ये वर्षभरात नोंदणी होणाऱ्या सर्व स्थळांची माहिती व संपर्क क्रमांक मिळतील. तसेच पसंतीच्या स्थळांना एस.एम.एस. पाठवण्याची व 'चॅट' ची सुविधा मिळेल. आपले १० फोटो अपलोट करण्याची सुविधा शिवाय संस्थेच्या 'नवस्नेह' मासिकांत आपल्या स्थळाची माहिती एकदा प्रसिद्ध केली जाईल. याचबरोबर पंचरत्न वधूवर सूचक केंद्राकडून pancharatnavivah.co.in या वेबसाईटमधील १०० स्थळे सहा महिने मुदतीत मोफत पहायला मिळतील. (अधिक माहितीसाठी संपर्क : 9881291863)

२) **श्री योगेश्वरी पॅकेज :- स्वागत शुल्क रु. १,५००/- (सहा महिन्यांसाठी)**
या पॅकेजमध्ये तुम्हाला सहा महिने इंटरनेट नोंदणी मिळेल. त्याचबरोबर या पॅकेजमध्ये तुम्हाला १२५ स्थळांची माहिती व संपर्क क्रमांक मिळतील. पसंतीच्या स्थळांना एस.एम.एस. पाठवण्याची व 'चॅट'ची सुविधाही तुम्हाला मिळेल. आपले १० फोटो अपलोड करण्याची सुविधाही यामध्ये आहे.

३) **श्री महालक्ष्मी पॅकेज :- स्वागत शुल्क रु. १,०००/- (तीन महिन्यांसाठी)**
यामध्ये नोंदणी करणाऱ्यांना तीन महिने इंटरनेट नोंदणी उपलब्ध असेल. ५० स्थळांचे संपर्क क्रमांक व माहिती मिळू शकेल. पसंतीच्या स्थळांना एस.एम.एस. व 'चॅटींग' सुविधा तसेच आपले किमान १० फोटो अपलोड करता येण्याची सुविधाही या पॅकेजमध्ये देण्यात आली आहे.

उपवर ब्राह्मण तरुण तरुणींनी आजच नोंदणी करून या सवलतीच्या पॅकेजचा लाभ घ्यावा. आमच्या माध्यमातून आपला विवाह लौकरच संपन्न व्हावा या शुभेच्छा !

# कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष ८ वे : अंक ५ : ऑगस्ट २०२२**

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** श्री. पुष्कर ताम्हनकर 9890737221
  सौ. पल्लवी देशमुख 9420455984


## अनुक्रम


१) **संपादकीय** /४

२) **श्रावणी** /५ – नंदकुमार मराठे

३) **लौकिक दंतकथांचे वास्तव** /६
– सुधीर दाजी जोशी

४) **छत्रपती शिवरायांचे अष्टप्रधान मंडळ** /९
– गुरुप्रसाद कानिटकर

५) **सुटका** /११ – कौस्तुभ ताम्हनकर

६) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'** / १२
– सौ. मंजुश्री गोखले

७) **ज्ञानसूर्याची सावली** /१४ – सौ. मंजुश्री गोखले

८) **श्रीधान्यांना शरण जायला हवे**/१६
– डॉ. सुश्मिता गाडगीळ

९) **लहान मुले नैसर्गिक पद्धतीने भाषा शिकू शकतात** / १८ – इंद्राणी केळकर

१०) **गोदावरी परिक्रमा** /२१

११) **ब्राह्मण समाज अभिमानास्पद व्यक्ती गौरव** /२३

१२) **वधूवर माहिती यादी** /२५



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स,
  १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर.
  मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे
  विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस,
  कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०




सुवर्णमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५

- **संचालक मंडळ**

**श्री. सदानंद दिनकर मराठे** (अध्यक्ष)
0231-2541823
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष)
9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह)
7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह)
9881077513
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार)
8149480034

- **संचालक**

सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. विठ्ठल गणेश नरवणे 9765971524
श्री. मकरंद विष्णू करंदीकर 9421113005
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडीलकर 9422046611

**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६**
**(साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.



**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. ८ वर दिली आहे.**

# संपादकीय...

नमस्कार मंडळी,

पावसाचं धूमशान चालू आहे ना? सांभाळा हं! कुठंतरी आणि कुठंही वेडं धाडस करू नका. कारण पाणी आणि आग ही दोन भुतं (पंचमहाभूतांपैकी) अशी आहेत जिथं चुकीला माफी नाही. तुम्ही चुकलात की जिवाला मुकलात. तेव्हा सांभाळून ! तर पाऊस धुमाकूळ घालतो आहे. घालू दे बिचारा, नाहीतरी आपण थांब म्हंटल्यावर तो थांबणार आहे थोडाच !

मित्रांनो, नुकतीच आषाढी झाली. आता श्रावण आला. सृष्टीच्या शृंगाराला सुरुवात झाली. सगळे सणवार आले. आता बाप्पा पण याच महिन्यात येत आहेत. एकंदरच उत्साहाचं, उल्हासाचं, आनंदाचं वातावरण आहे. खरं सांगू? हे सणवार असतातच यासाठी. आणि आता तर या टेक्नॉसॅव्ही युगात परंपरा म्हणून आणि आपण सोशल मिडियावर किती ॲक्टीव्ह आहोत हे दाखवण्यासाठी हे सणवार एका आगळ्या उत्साहात साजरे केले जातात. अर्थात हे एका परीनं छान आहे. सोशल मिडियावरून आठवलं. काही अपप्रवृत्तीचे मुखवटे, काहीं समाजाला घातक ठरणारे वाद-विवाद, सोयी, गैरसोयीचं राजकारण या सगळ्यांचे मुखवटे या सोशल मिडियावर फाडले जातात. हे एक चांगलं शस्त्र आहे. कारण आता

**अगर तोप मुकाबिल है**
**तो अखबार निकालो ।**

याला काहीच अर्थ नाही. वर्तमानपत्र वाचायला सुद्धा धाडस गोळा करावं लागतं. असो.

आपला नवस्नेहचा अंक सणवार साजरे करण्याच्या आणि परंपरा जपण्याच्या या आनंदात सहभागी होतोच. या अंकातही श्रावण महिन्याचं औचित्य साधून आपले संपादक श्री. नंदकुमार मराठे यांचा 'श्रावणी' हा लेख आवर्जून घेतला आहे. श्रावण महिन्यात जुनं यज्ञोपवीत बदलून नवीन धारण करण्याची प्रथा आहे. यज्ञोपवीत हे मांगल्याचा, पावित्र्याचा आणि सामर्थ्याचा संकेत आहे आणि आपण ब्राह्मण ते धारण करतो. म्हणजे मांगल्य, पावित्र्य आणि सामर्थ्य आपण धारण करतो. या लेखासोबतच इतर लेखमालाही आहेतच.

**जिंदगी जीने का मकसद खास होना चाहिए ।**
**अपने आप पर विश्वास होना चाहिए ।**
**जीवन में खुशियोंकी कमी नहीं है बंधू ।**
**बस खुशियाँ मनानेका अंदाज होना चाहिए ।**

तेव्हा

**तय करो अंदाज अपना ।**
**पसंद अपनी, खयाय अपना ।**

खरं ना? असो.

मागच्या नवस्नेहच्या अंकात आम्ही एक आवाहन केलं होतं. आज पुन्हा सांगते आहे. आम्हाला आपले अभिप्राय आणि मार्गदर्शनपर सूचना हव्या आहेत. आम्ही वाट पाहतो आहोत. तेव्हा जरूर पाठवा.

श्रावण-भाद्रपदात येणाऱ्या सर्व सणांच्या तुम्हा सर्वांना भरभरून शुभेच्छा ! अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिनाच्या अमृत शुभेच्छा !

या शुभेच्छांसह एक नम्र विनंती, पावसाळा गर्द आहे. आपली प्रकृती आणि वेड्या धाडसानं पछाडलेली आपली लेकरं सांभाळा ! धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,
**सौ. मंजुश्री गोखले,**
मोबा. ८८०५३५५२००

# श्रावणी

'श्रावणी' म्हटले की, यज्ञोपवीत बदलणे किंवा नव्याने धारण करणे एवढेच आपल्याला आठवते. परंतु श्रावणीची प्रथा प्राचीन आहे. त्रैवर्णिकांना श्रावणी विहीत असली तरी सांप्रत विप्रांकडून ती प्रथा रूढ असल्याचे आढळते. गृह्यसूत्रात या श्रावणीबाबत संकेत स्पष्ट आहेत. या संकेतानुसार श्रावणी सामुदायिकरित्या करावी, असे मार्गदर्शक सूत्र आहे.

प्राचीन काळी पाऊस, पीकपाणी व्यवस्था झाल्यावर श्रावण भाद्रपद किंवा अश्विन महिन्यात वेदाध्यायन थांबवायचे असल्यास उत्सर्जन कर्म व त्यानंतर उपाकर्म करीत असल्याचे उल्लेख येतात. श्रावण मासातील श्रवण नक्षत्रावर करावयाचा एक वैदिक विधी म्हणून या श्रावणीकडे पाहिले जाते. या श्रावणीत मोठा अनध्याय संपवून पुनश्च अध्यापनाला सुरुवात केली जाते. या विधीला उपाकर्म किंवा उपाकरण असेही संबोधतात. श्रावण शुद्ध पंचमी, नागपंचमी अथवा श्रावणी पौर्णिमेला 'ऋग्वेदी' जनानी श्रावणी करण्याची प्रथा रूढ आहे. 'यजुर्वेदी' जनासाठी श्रावणी पौर्णिमा हा मुख्य कालावधी आहे. भाद्रपदातील हस्त नक्षत्रावर 'सामवेदी' जनाकडून श्रावणी केली जाते.

या विधीत उपाध्ये मंडळींकडून स्थालीपाक प्रयोगानुरूप 'बलवर्धन' नावाच्या अग्नीची स्थापना करून अग्नीमुख केला जातो. सावित्री, ब्रह्मा, श्रद्धो मेघा, प्रज्ञा, धारणा, सदस्पती, अनुमती, छंद व ऋषी या प्रधान देवतांचे आज्यांने हवन केले जाते. अग्नी, अप्तृण सूर्य, अग्नी, शंकूत्र, मित्रावरण, अग्नी जप, अग्नी मरून, अग्नी विश्वेदेव, अग्नी इंद्रसोम, इंद्र अग्न्यामरूत, पवमान, सोम, अग्नी व संज्ञान या देवतांसाठी गृहसिद्ध चरूने हवन करतात.

सर्व सहभागी जनाकडून ब्रह्मयज्ञ केला जातो. स्विष्ठकृतादी होम समाप्त झाल्यावर पवित्रक विसर्जन करतात. यानंतर जलाशयावर 'गोमय स्नान', 'भस्मस्नान', 'मृत्तिकास्नान', 'शुद्ध स्नान' करण्याची पद्धत आहे. स्नानांग तर्पण विधीसाठी अरुंधतीसह कश्यप व सप्तऋषींचे नांवे आसनावर पीठांची स्थापना केली जाते. यज्ञोपवीत सव्याने ब्रह्मादी देवांचे निविती करून ऋषींचे अपसव्य करून कव्य वाहनादी पितरांचे व आत्मपितरांचे तर्पण करतात. नदीची प्रार्थना करतात. यानंतर दुसऱ्या सत्रात उपकर्मास प्रारंभ करतात. पहिल्या प्रधान देवतांसाठी आज्याने व दुसऱ्या प्रधान देवतांसाठी दह्यात भिजवलेल्या सातूने किंवा तांदळाच्या पीठाच्या दोन गोळ्यांनी हवन केले जाते. पंचप्रवरी असल्यास तीन गोळ्यांनी हवन करतात. या गोळ्या दात न लावता पाण्याबरोबर गिळून टाकतात. त्यानंतर यज्ञोपवीतांचे हवन करावे. उपाध्यांना ही यज्ञोपवीत अर्पण करतात. यज्ञोपवीत मंत्रांनी अभिमंत्रित केलेले यज्ञोपवीत धारण केले जाते. शेवटी ब्रह्मयज्ञ करून होम समाप्त होतो.

नव्याने मौजीबंधन झालेल्या बटूने ब्रह्मचारी श्रावणी विधीत मेखला, यज्ञोपवीत, दंड, कृपाजीन, कटीसूत्र आणि नववस्त्र धारण करून उपकर्माने वेदग्रहण करावयाचे असते. या अभिमंत्रीत यज्ञोपवीताला लौकिक अर्थाने **जानवे** असे संबोधतात. उपनयन (मुंज) झाल्यावर गळ्यात यज्ञोपवीत धारण केले जाते. श्रौत व स्मार्त कर्म अनुष्ठान सिद्धीसाठी यज्ञोपवीत धारण करतात. याज्ञवल्कलाने यज्ञोपवीताला ब्रह्मसूत्र म्हटले आहे. हे यज्ञोपवीत देवकार्याचे वेळी डाव्या खांद्यावर म्हणजे 'सव्य', पितृकार्यावेळी उजव्या खांद्यावर म्हणजे 'अपसव्य', अन्यवेळी मातृष, कर्माचे वेळी निविती म्हणजे माळेसारखे धारण करतात.

ब्रह्मचाऱ्याने एक, गृहस्थाश्रमी व वानप्रस्थाश्रमी दोन आणि यतीने एक यज्ञोपवीत धारण करण्याची प्रथा आहे. प्राचीन काळी काळविटाचे चामडे किंवा वस्त्र यज्ञोपवीत म्हणून धारण करीत. तसेच प्राचीन काळी स्त्रियाही यज्ञोपवीत धारण करीत असाव्यात, असे उल्लेख गोभीलगृह्यसूत्रात आढळतात.

विविध ज्ञातीबांधवांत कापसाचे, सुताचे, तागाच्या दोऱ्याचे किंवा बकरीच्या लोकरीचे यज्ञोपवीत वापरले जात असे. तीन सूत्रे एकत्र करून त्याचा एक पदर तयार होतो, असे तीन पदर एकत्र करून एक गाठ बांधली जाते. त्याला ब्रह्मगांठ असे म्हणतात व तेच यज्ञोपवीत होय. यज्ञोपवीतात एकूण नऊ सूत्रे असतात. त्यांची लांबी ९६ अंगुळे असते. ज्ञानेश्वर माऊली यज्ञोपवीताला नवरत्नांचा हार अशी उपमा देतात. जानवे तुटले, नष्ट झाल्यास, जनशौच, मरणशौच, स्मशान गमन झाल्यावर अथवा सूर्यचंद्र ग्रहणानंतर यज्ञोपवीत गायत्री मंत्र म्हणून धारण करावे. जुने यज्ञोपवीत कमरेखालून काढावे व विसर्जित करावे, असे व्रतराज शिरोमणी ग्रंथात संकेत दिले आहेत.

**– नंदकुमार मराठे,** फोन ०२३१-२५४१८२३

# लौकिक दंतकथांचे वास्तव

**(लेखांक पाचवा)**

'मी कोण आहे? मी कुठून आलो आहे? माझ्या सभोवतालचे हे विश्व कोणी निर्माण केले? झाडे कशी उगवतात? माथ्यावर, उंचावर दिसणारे सूर्य, चंद्र, तारे म्हणजे काय आहे? ते खाली का पडत नाहीत? आकाशातून पाणी कसे पडते? सनातन काळापासून हे प्रश्न मानवाला पडले होते. माणूस हा 'विचार करणारा प्राणी' असल्याने या प्रश्नांचा त्याने विचार केला. उत्तरे शोधताना अनुभव आणि कल्पना यांचा मेळ घालता घालता तयार झाली ती 'मिथके'. मिथके म्हणजे सत्य की असत्य याचा पडताळा न करता पूर्वापार चालत आलेल्या गोष्टी. या खऱ्याही नसतात आणि खोट्याही नसतात. त्या आहेत असे आपण मानत असतो. काही गोष्टी, घटना आपण एकमेकांना कानात गुपीत म्हणून सांगत असतो. एका व्यक्तीकडून ऐकलेली गोष्ट दुसऱ्या व्यक्तीच्या कानात सांगताना ती व्यक्ती स्वत:च्या कल्पनेनुसार काही भाग त्यात मिसळते अथवा वगळते. अशी साखळी जेव्हा पूर्ण होते, तेव्हा बाहेर आलेली शेवटची गोष्ट ही पहिल्यापेक्षा निराळीच असते. याला म्हणतात 'कानगोष्टी'. अशाच काही गोष्टी एकमेकांना समूहात सांगतात. त्यांचा काही ठळक पुरावा नसतो. पिढी दर पिढी त्या अनुभवत, करत, सांगत राहिल्याने खऱ्या वाटू लागतात. त्यांना म्हणतात, 'दंतकथा'.

मानवाच्या प्रगतीच्या काळात त्याला सर्वप्रथम जाणीव झाली की देहाची. हा देह नश्वर आहे हे त्याला समजले. त्या काळी वयोमर्यादा खूप कमी असे. जन्म आणि मृत्यूचे कोडे उलगडण्याआधी त्याला समजले की हा देह मौल्यवान आहे. मृत्यूनंतर देह कुजतो. जीव असेपर्यंत या देहाला जपायला हवे याची जाण त्याला आली. त्या काळात बालमृत्यूचे प्रमाण अधिक प्रमाणात होते. त्यामुळे मूल लहान असताना त्याची जपणूक तो करू लागला. त्याला काही इजा होऊ नये, आजार होऊ नये याची काळजी तो परोपरीने घेऊ लागला. या काळजीपोटीच एक दंतकथा निपजली. ती म्हणजे दृष्ट लागणे.

**दृष्ट लागणे – नजर लागणे**

आदिम काळात वैद्यकीय प्रगती झाली नव्हती. काही प्रमाणात मानवाला झाडपाल्याची औषधे माहिती होऊ लागली होती. परंतु काही रोगांवर त्याच्याकडे इलाज नव्हता. हे रोग कशामुळे होतायत? त्यासाठी काय करावं? हे त्याला समजत नव्हतं. आपल्या डोळ्यादेखत मृत्यूमुखी पडणाऱ्या आप्तांबद्दल त्याला दु:ख होत होतं. त्याला जरी ही औषधे माहित नसली तरी त्याला समोरच्या माणसाच्या नजरेतल्या भावना समजत होत्या. एखादी व्यक्ती असूयेने बघते आहे, रागाने बघते आहे की प्रेमाने बघते आहे? आपल्या मुलाबद्दल असलेला हक्क दुसरी व्यक्ती हिरावून तर घेत नाहिये ना? त्या व्यक्तीच्या नजरेत द्वेष आहे का? हे मात्र त्याला कळत होतं, उमजत होतं. त्यातूनच आपल्या मुलास, जवळच्या व्यक्तीस एखाद्याची नजर लागते ही समजूत दृढ होत गेली, ती नजर काढण्यासाठी, त्याची दृष्ट काढण्यासाठी त्याने काही उपाय करून बघितले.

एखाद्याला दृष्ट लागते ही समजूत जगात सर्वदूर पसरलेली आहे. फक्त व्यक्तीच नव्हे, तर मौल्यवान वस्तूस एकाएकी अपाय झाला किंवा तिच्यात एकाएकी काही बदल झाला तर तो दृष्ट लागल्याचा परिणाम आहे असे म्हणतात. पाळीव जनावरांनाही दृष्ट लागते असे मानतात.

**दृष्ट काढण्याचे प्रकार**

दृष्ट लागलेल्या मनुष्याभोवती सुक्या मिरच्या ओवाळून त्या विस्तवात टाकतात. त्या तडतडल्या नाहीत तर दृष्ट गेली असे समजतात. मीठमोहरी ओवाळून विस्तवात टाकतात. मांत्रिक येऊन मुलाभोवती तुरटी ओवाळतो. तुरटी ओवाळून विस्तवात टाकल्यावर त्या तुरटीला पुरुष अथवा स्त्रीचा आकार येतो. त्यावरून दृष्ट लावणारी व्यक्ती स्त्री की पुरुष ते ओळखता येते. नंतर दृष्ट लागलेल्या

इसमाच्या डाव्या पायाच्या अंगठ्याने तो आकार मोडून टाकतात आणि सुक्या मिरच्या, लसूण, केस, कचरा, मीठ इ. त्या तुरटीच्या पुडीत मिसळतात. हे त्या व्यक्तीभोवती ओवाळून विस्तवात टाकतात. यावेळी मांत्रिक मंत्र पुटपुटत असतो. हे तीन वेळा करतात व तिठ्यावर नेऊ ठेवतात. भुताच्या दृष्टीची खात्री असल्यास मांत्रिक काही शब्द उच्चारून दृष्ट लागलेल्या मुलाभोवती राख ओवाळून हवेत फुंकून टाकतो. तांब्याचे ताईत अगर काळे दोरे मांत्रिकाकडून भारून घेऊन ते दृष्ट लागलेल्या इसमाच्या गळ्यात घालतात अगर हातात बांधतात. पिंपळाच्या लाकडाची मूर्ती करून ओवाळून जाळून टाकतात. काही ठिकाणी फुले ओवाळून पाण्यात टाकतात. एका मातीच्या थाळ्यात तापवून लाल केलेले मातीचे बोळके उपडे ठेवतात व त्यावर शेणपाणी ओततात. असे केल्याने बोळके थाळ्याला चिकटते. जेव्हा ते सुटते तेव्हा दृष्टीची बाधा नाहिशी झाली असे समजतात.

मांत्रिक एक केरसुणी घेऊन ज्याची दृष्ट लागण्याचा संभव असतो त्याची नावे उच्चारून दृष्ट लागलेल्या इसमाच्या डोक्यापासून पायापर्यंत ती फिरवतो. नंतर केरसुणीचा लहानसा तुकडा कापून त्यावर थुंकतो व तो पायाने तुडवून जमिनीत गाडून टाकतो. केरसुणी ऐवजी लुगडेही फिरवतात. एका कवडीत काळा दोरा घालून पायास बांधतात. कर्नाटकात हात धुतलेले पाणी घेऊन त्यात उष्टे अन्न घालतात व नंतर त्यात गरम राख घालतात. ज्याची दृष्ट लागली असेल त्याच्या डोक्याचा अथवा भुवईचा केस जाळतात. घराच्या दरवाजाच्या कपाळपट्टीला शेण चिकटवतात आणि एक काळी वात गोड्या तेलात भिजवून त्यात खुपसतात. नंतर ती पेटवतात. जळताना चरचर आवाज झाला तर दृष्टीची बाधा नाहीशी झाली असे समजतात. काळे दोरे भारून ते खाऱ्या पाण्यात भिजवतात आणि दगडाला बांधून जाळतात. एक काकडा तेलात भिजवून पेटवतात व तो दृष्ट लागलेल्या इसमाभोवती ओवाळतात. नंतर तो पाण्यावर धरतात. त्याचा थेंब पाण्यात पडल्यावर चर्र आवाज आला तर दृष्ट गेली असे समजतात. फळझाडास दृष्ट लागू नये म्हणून त्या झाडाला खापऱ्या, जुन्या केरसुण्या आणि जुने जोडे बांधतात.

लहान मुलाला दृष्ट लागू नये म्हणून डोळ्यात काजळ घालतात. त्याच्या गालावर, कपाळावर काजळाचे बोट लावतात. याचा कधीकधी अतिरेक करतात व देखणे मुल विद्रूप दिसू लागते. हातात रक्षा घेऊन रामरक्षा म्हणतात आणि ती म्हणताना विविध अंगांना रक्षा लावतात. रक्षेऐवजी भस्म, उदीही घेतात. काही ठिकाणी तांदूळ ओवाळून टाकतात. हळदीची, खजुरीची पाने, तांबूल, वहाण, जुना जोडा, भाकरीचा तुकडा, मिरे, काळी वात, चिंचेच्या झाडाच्या तीन काड्या, कौलाचे तुकडे, सूप इत्यादी गोष्टी ओवाळून टाकण्याची प्रथा आहे.

**दृष्ट काढताना म्हणायचा मंत्र**

दृष्ट काढण्यासाठी घेतलेले साहित्य हाताच्या दोन्ही मुठीत घ्यायचे. त्या मुठी फुली मारल्यासारख्या व गोलाकार त्या व्यक्तीच्या समोर फिरवायच्या. मंत्र म्हणून होत आला की, डोक्यापासून पायापर्यंत फिरवायच्या या क्रिया ३ अथवा ७ वेळा करण्याची प्रथा आहे. मंत्र म्हणून झाल्यावर मुठीवर फुंकर मारतात व मुठीतील साहित्य निखाऱ्यात, पाण्यात टाकतात. तो मंत्र असा- ''चांडाळाची, भुताखेताची, आल्या-गेल्याची, आयाबायांची, घरातल्यांची, दारातल्यांची, काळ्या-गोऱ्या माणसांची, दाराची-केराची, साऱ्यांची दृष्ट चुलीत पडो व दृष्ट खरखरून पडो.''

या व्यतिरिक्त अनेक प्रकारचे मंत्र दृष्ट काढताना म्हणण्याची प्रथा आहे. शनिवारी, अमावास्येला, पौर्णिमेला, तिन्हीसांजेच्या वेळेला काढलेली दृष्ट लवकर उतरते अशी समजूत आहे. तान्ह्या मुलाची दृष्ट रोज संध्याकाळी काढतात. मोठ्या माणसांची, आजारी व्यक्तीची, गरोदर स्त्रीची, नवी नवरी गृहप्रवेश करताना तिची, नव्या नवऱ्याची अशा सर्वांची दृष्ट काढतातच. परंतु जनावरांची, झाडांची, शेताची, घराची, जमिनीची, मौल्यवान वस्तूचीही नजर काढतात. दृष्ट काढताना बहुतेक ज्या वस्तू वापरतात त्या तुच्छतादर्शक, केर-कचऱ्याच्या असतात. या वस्तू कोणत्या? ते पाहूया.

अंगारा, कवड्या, मिरच्या, निंबाची पाने, लसूण-कांद्याची साल, केस, मोहोर, तिठ्यावरील

माती, केरसुण्या, केर, तुरटी, फुले, अस्वलाचे केस, स्वस्तिक, शिजवलेले अन्न, मोहोऱ्या, मीठ, जोडे यांसारख्या अनेक वस्तू दृष्ट काढण्यासाठी वापरण्याची प्रथा आहे. याहूनही वेगळ्या अनेक वस्तू आहेत, परंतु विस्तार भयास्तव त्या देत नाही.

व्यक्तीला, मुलास दृष्ट लागल्यावर त्याला ताप येतो, थकवा येतो, अंगावर पुरळ उठतं, मूल अचानक रडू लागतं, मोठ्या माणसाला अपचन होते, त्याची तहान-भूक जाते, फिट येते, कापरे भरते, खूप घाम येतो अशी समजूत आहे. तसेच पुष्कळ दूध देणारी गाय अथवा म्हैस अचानक दूध देईनाशी होते, तिच्या आंचळातून रक्त येते. शेते, झाडे वाळून जातात. चांगली मूर्ती विद्रूप होते अथवा भंग पावते. पूजेतल्या दगडांच्या ठिकऱ्या उडतात. ताजे अन्न, दूध नासते. असे झाल्यास दृष्ट लागली असे म्हणतात.


उत्तम लक्षणांनी युक्त व्यक्ती, उत्तम शिकारी, चांगला कलाकार, लोणची, शेवया, सर्व मोहक वस्तू, गरोदर स्त्री, नटलेली स्त्री या सर्वांना दृष्ट लागण्याचा संभव जास्त असतो असे मानतात. साहजिकच आहे. अशा व्यक्ती वा वस्तू सर्वांच्या नजरेत भरतात. त्यांची स्तुती होते. म्हणून असे मानतात. परंतु या सर्वांच्या मागचा कार्यकारणभाव आपण लक्षात घ्यायला हवा. आजारी व्यक्ती, गुरांना डॉक्टरांकडे नेणे आधी गरजेचे आहे. वस्तू बिघडल्यास त्या कशाने बिघडल्या? याचा विवेकाने विचार व्हावा. आपण कितीही पुढारलेले असू, परंतु अजूनही अनेक व्यक्ती 'दृष्ट लागते' हे खरे मानतात. अर्थात दृष्ट काढल्यास नुकसान काही नाही परंतु त्याचा अतिरेक होऊ नये. दुसऱ्यास त्रास होऊ नये याची काळजी घ्यावी. लहान मुलास दृष्ट लागू नये, ते सुदृढ राहून जगावे, यासाठी त्याचे तिरस्कारवाचक नाव ठेवतात. पण हा विषय आपण पुढील लेखांत पाहूया.

**– सुधीर दाजी जोशी,**
मोबा. ९८२२२९८७२६

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी**
**आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**बँक ऑफ महाराष्ट्र, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 20128506183)**
**IFSC Code : MAHB0000326**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

**दिनविशेष (ऑगस्ट, २०२२)**
**श्रावण - भाद्रपद शालिवाहन शके १९४४**
**प्लवनाम संवत्सरे**

सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका
**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे।**
**साक्षात लक्ष्मी वसे तिथे।**




**सोमवार दि. १ :** बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी, **मंगळवार दि. २ :** नागपंचमी, **सोमवार दि. ८ :** पुत्रदा एकादशी, **मंगळवार दि. ९ :** मोहरम, ऑगस्ट क्रांतिदिन, जागतिक आदिवासी दिन, **गुरुवार दि. ११ :** नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, **शनिवार दि. १३ :** पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुण्यतिथी, **सोमवार दि. १५ :** स्वातंत्र्य दिन, संकष्ट चतुर्थी (चंद्रो.९.३९), संत बाळूमामा पुण्यतिथी जागर(आदमापूर), **मंगळवार दि. १६ :** पारशी नूतन वर्ष सन १३९२ प्रारंभ, **गुरुवार दि. १८ :** श्रीकृष्ण जन्माष्टमी, चिले महाराज जयंती, **शुक्रवार दि. १९ :** जागतिक छायाचित्र दिन, गोपाळकाला, श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज जयंती, **रविवार दि. २१ :** श्रीकृष्ण सरस्वती पुण्य., **मंगळवार दि. २३ :** श्री काडसिद्धेश्वर स्वामी पुण्यतिथी, स्वामी स्वरुपानंद पुण्यतिथी, **गुरुवार दि. २५ :** शिवरात्री, गुरुपुष्यामृत, **शुक्रवार दि. २६ :** पोळा, **रविवार दि. २८ :** बालमुकुंद बालावधूत जयंती, **बुधवार दि. ३१ :** श्री गणेश चतुर्थी

# छत्रपती शिवरायांचे अष्टप्रधान मंडळ

## (लेखांक दुसरा)

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. ६ जून १६७४ रोजी शिवाजी राजांचा राज्याभिषेक झाला. ते सिंहासनाधीश्वर झाले. स्वत: छत्रपती झाल्यानंतर राजांनी स्वराज्याच्या राज्यकारभाराचा आराखडा तयार केला. वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी वेगवेगळ्या माणसांची नेमणूक केली. त्यात अष्टप्रधान मंडळाची स्थापना केली. जाती पातीच्या पलिकडे जाऊन राजांनी स्वराज्याशी असलेली निष्ठा, पराक्रम, बुद्धीचातुर्य आणि इमानीपणा याच आणि याच गुणांचा केवळ विचार केला आणि अष्टप्रधान मंडळाची स्थापना केली. या अष्टप्रधान मंडळाच्या साहाय्याने राजांनी अत्यंत यशस्वी आणि दक्ष राज्यकारभार केला. या अष्टप्रधान मंडळात सात जण ब्राह्मण होते. त्यांची नावे अशी – १. पंतप्रधान : मोरोपंत त्रिंबक पिंगळे, २. पंत अमात्य : रामचंद्र निलकंठ, ३. पंत सचिव : अण्णाजी पंत दत्तो, ४. मंत्री : दत्ताजीपंत त्रिंबक, ५. सेनापती : हंबीरराव मोहिते, ६. पंत सुमंत : रामचंद्र त्रिंबक, ७. न्यायाधीश : निराजीपंत रावजी, ८. पंडितराव दानाध्यक्ष : मोरेश्वर पंडित.

**'प्रधान अमात्य सचिव मंत्री, सुमंत न्यायाधीश धर्मशास्त्री, सेनापती त्यात असे सुजाणा, अष्टप्रधानी शिवमुख्यराणा'**

या लेखात छत्रपतींचे अष्टप्रधान मंडळातील पंत अमात्य 'रामचंद्र निलकंठ' यांच्याबद्दल उपलब्ध असलेली माहिती आपण घेणार आहोत.

**रामचंद्रपंत अमात्य : (१६५०–१७१६)**

शककर्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्यापासून ते छत्रपती दुसरे संभाजी महाराज (करवीर गादी) यांच्यापर्यंत ५ छत्रपतींच्या प्रधानमंडळात अत्यंत जबाबदारीची व जोखमीची कामगिरी पार पाडणारे शिवकाळातील एक मुत्सद्दी व राजनीतीवरील 'आज्ञापत्र' या प्रसिद्ध ग्रंथाचे कर्ते म्हणजे रामचंद्रपंत अमात्य! त्यांचे आडनाव भादणेकर होते.

रामचंद्रपंतांचे वडील निळो सोनदेव हे शिवछत्रपतींचे अमात्य! त्यांच्याकडे पूर्वापार देशमुखी वतन होते. ते १६५७ पासून स्वराज्याच्या सेवेत होते आणि १६६५ च्या सुमारास त्यांना अमात्यपद मिळाले. त्यांना सोनोपंत व रामचंद्रपंत असे दोन सुपुत्र होते. निळोसोनदेवांचे १६७२ साली निधन झाल्यानंतर त्यांचे ज्येष्ठ सुपुत्र नारोपंत हे अमात्य झाले. परंतु ते अकार्यक्षम असल्याने १६६८ सालापासून हा सर्व कार्यभार सिंधुदुर्गचा सबनीस असलेला त्यांचा धाकटा भाऊ रामचंद्रपंतच पहात असे. राज्याभिषेकाच्या वेळी नेमलेल्या अष्टप्रधानांच्या यादीत नारो निळकंठ आणि रामचंद्र निळकंठ या दोघांचाही 'अमात्य' म्हणून उल्लेख आहे. परंतु प्रत्यक्षात सर्व कारभार राचंद्रपंतांकडे होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी १६७७ च्या सुमारास रामचंद्रपंतांना अमात्य पदावरून दूर करून ते पद रघुनाथ हणमंते यास दिले. पण नंतर ते राजाराम महाराजांच्या काळात परत रामचंद्र पंतांकडे आले.

छत्रपती राजाराम महाराजांनी १६९३ साली परत एकदा रामचंद्रपंतांना अमात्यपद दिले. त्यानंतर अखेरपर्यंत ते अमात्य होते. छत्रपती राजाराम महाराज जेव्हा दक्षिणेतील मराठ्यांचा किल्ला जिंजी येथे आश्रयार्थ गेले, तेव्हा चहूबाजूंनी मुघलांनी वेढलेल्या मराठ्यांच्या राज्याला सावरणारे रामचंद्रपंत अमात्य, संताजी घोरपडे, धनाजी जाधव हे प्रमुख आधारस्तंभ होते. जिंजीला जाण्यापूर्वी छत्रपती राजाराम महाराजांनी त्यांना 'हुकुमतपन्हा' हा किताब दिला होता. मराठी राज्यावर कोसळलेले मोगलांचे अरिष्ट टाळण्याची महत्वपूर्ण कामगिरी त्यांनी सातत्याने

बजावली व आपल्या स्वराज्यनिष्ठेची पराकाष्ठा केली. छत्रपती राजाराम महाराजांच्या निधनानंतर त्यांचे व महाराणी ताराबाई यांचे पुत्र दुसरे शिवाजी महाराज यांस छत्रपती बनविले व पन्हाळगडावर मराठ्यांची राजसत्ता निर्माण केली. सन १७०७ मध्ये शाहू महाराजांची औरंगजेबाच्या कैदेतून सुटका झाल्यानंतर रामचंद्रपंतांनी महाराणी ताराबाईंचाच पक्ष उचलून धरला व पुढे महाराणी ताराबाईंशी देखील न पटल्याने आणि कदाचित काळाची गरज म्हणून त्यांनी महाराणी ताराबाई आणि दुसरे शिवाजी महाराज यांना पदच्युत करून छत्रपती राजाराम महाराजांच्या दुसऱ्या पत्नी महाराणी राजसबाई यांचे पुत्र दुसरे संभाजी महाराज यांस छत्रपतिपद मिळविण्याच्या कामी साहाय्य केले. त्यावेळच्या राजवाड्यांतील या रक्तहीन सत्तांतरात रामचंद्रपंतांचा मोठा वाटा होता, हे पोर्तुगीजांशी झालेल्या त्याच्या पत्रव्यवहारावरून सिद्ध होते. त्याच्या दूरदृष्टीचा आणि मुत्सद्देगिरीचा येथे प्रत्यय येतो.

इतिहासात पुढे प्रसिद्ध झालेल्या व शाहू महाराजांचे पेशवा असलेल्या भट कुटुंबाचा प्रसिद्धी पावलेला मूळ पुरुष बाळाजी विश्वनाथ हे आपल्या उमेदवारीच्या काळात रामचंद्र अमात्यांकडे कामाला होते.

राजनीतीवरील कौटिलीय अर्थशास्त्राच्या तोडीचा आज्ञापत्र हा ग्रंथ त्यांनी दुसऱ्या छत्रपती संभाजी महाराजांना उद्देशून १७१५ च्या सुमारास रचला. त्यांचे निधन पन्हाळ्यास १७ फेब्रुवारी ते १३ मार्च १७१६ च्या दरम्यात केव्हातरी झाले असावे, असे इतिहासतज्ञ मानतात. पन्हाळ्यावर त्यांची समाधी व छत्री आहे. त्यांचे वंशज आजही कोल्हापुरात असतात व ते समाजकारणात सक्रीय असणारे सन्माननीय लोक आहेत.

सभासद बखारीत रामचंद्रपंतांविषयी म्हटले आहे –'राजियाचा (शिवाजी) लोभ फार की हा मोठा शहाणा, दैवाचा, भाग्यवंत, बापापेक्षा लक्षगुणी थोर होईल.' मराठ्यांच्या पाच राजवटी पाहिलेल्या या पुरुषाबद्दल रियासतकार गो. स. सरदेसाई म्हणतात, 'शिवाजींच्या वेळेपासून राज्याची एकनिष्ठ सेवा केलेला असा हा एकच पुरूष मराठ्यांचे इतिहासात मोठा सन्मान्य दिसतो. त्याच्या राज्यकारभाराचा अनुभव त्याने लिहिलेल्या राजनीतीत ओतलेला आहे.'

**संदर्भ :**


- गर्गे, स. मा. करवीररियासत, पुणे, १९८० बनहट्टी, श्री. ना. शिवाजीराजांचीराजनीति, पुणे.
- गो. स. सरदेसाई, मराठी रियासत
- सभासद कृष्णाजी अनंत, सभासद बखर



**– गुरुप्रसाद कानिटकर,**

मोबा. ७७५५९१३७९१



**परशुराम पतसंस्था कार्यालयीन वेळ**
**सकाळी १०.०० ते सायं. ५.००**
**देवघेवीची वेळ**
**सकाळी १० ते ४.३० पर्यंत**

**'नवस्नेह' च्या माध्यमातून आपल्या पाल्याचे विवाह जुळल्यास पालकांनी कृपया याची माहिती कोल्हापूर चित्पावन संघास कळवावी, ही नम्र विनंती.**

## सभासदांसाठी भक्तनिवास नोंदणी विनामोबदला

आपली गैरसोय टाळण्यासाठी कोल्हापूर मुक्कामासाठी आपल्या भक्तनिवासाची आगावू नोंदणी करा.
तात्काळ नोंदणीसाठी **संपर्क : श्री. गिरीश जोग फोन : ९४०४६०९५९७, ९८२२०३८८९७**
येताना आधार कार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स अशा फोटो व पत्ता असणाऱ्या शासकीय दस्तऐवजाची प्रत जमा करणे आवश्यक आहे.

# सुटका

'एकता चाळ' पार मोडकळीला आली होती. पडायच्या आत ती Redevolopment ला गेली नाही तर रहिवाश्यांच्या डोक्यावर आकाशाचे छप्पर येणार हे नक्की होते. वीस लोकांची मोट बांधणे हे शिवधनुष्यच होते. ते शेवटी चाळीच्या दगडे-पाटील मालकांनी उचलले आणि बघता बघता अनेक मजल्यांची 'एकता को. ऑप. हौसिंग सोसायटी' उभी राहिली.

उत्साही सभासदांचे कार्यकारी मंडळ स्थापन झाले. अध्यक्षपदाची माळ अलगदपणे कार्येकरांच्या गळ्यात पडली. सर्व सदनिका धारकांना एकता संकुल म्हणजे एक कुटुंब वाटत होते . पहिल्या मजल्यावरील दोननंबरच्या सदनिकेतील तव्यावरील सुरमईचा वास चौथ्या मजल्यावर पोहोचण्या आधी त्यातील दोन पिसेस तिसऱ्या मजल्यावरील चौथ्या सदनिकेत पोहोचत असत. सर्व जणांच्या वागण्या बोलण्यात एकता खऱ्या अर्थाने ओतप्रोत भरलेली दिसत होती. पहिली तीन वर्षे आनंदात गेली. कार्येकर अध्यक्षपदा वरून नावापुरते उतरले आणि सचीवपदाची माळ त्यांच्या गळ्यात आपसूक येऊन पडली.

पुढील वर्षांच्या खांदे पालटात कार्यकारी मंडळात नवीन सभासद आले पण कार्येकर कामातून कांही सुटले नाहीत. खजिनदार,सचिव,अध्यक्ष तर कधी उपाध्यक्ष तर कधी उपसचिव अशी नुसती अदलाबदल करत कार्येकर सोसायटीचा गाडा चलवतच राहिले.

अशीच पंचवीस वर्षे उलटली. संकुलातील एकता दुभंगली होती.आता संकुलात कुरबुरी सुरू झाल्या होत्या.दोन गट पडले होते. कार्येकरांचे वय वाढले वयोपरत्वे येणाऱ्या व्याधी तनाघरी मुक्कामाला आल्या तरीपण सोसायटीच्या कामातून कार्येकरांची कांही सुटका होईना. अनेकवेळा त्यांनी राजीनामा दिला पण मंजूर करायला कोणीतरी हवे ना?सल्ला द्यायला शंभरजण पण पदाधिकारी व्हायला शून्यजण अशी परिस्थिती होती. सोसायटीच्या नावातील सहकारी हा शब्द काढून टाकावा किंवा त्याच्या मागे 'अ' तरी लावावा अशी कार्येकरांची मनोमन इच्छा होती.

सोसायटी म्हणजे पायातील बेडी जी त्यांनी अति उत्साहात पंचवीस वर्षांपूर्वी स्वतःच्या गळ्यात घालून घेतली होती. त्या बेडीचा आता सापळा झाला होता. कार्येकर त्यात अडकले होते. या सापळ्यातून सुटायचे कसे? या विचाराने कार्येकर त्रस्त होते. काट्याने काटा काढावा किंवा जसास तसे या म्हणींचा इथे कांही उपयोग नव्हता.

एक दिवस कार्येकरांना पहाटे स्वप्न पडले. त्यात ते आरोपीच्या पिंजऱ्यात उभे होते आणि त्यांच्यावर अफरातफरीचे आरोप केले जात होते. त्यांना न्यायाधिशांनी शिक्षा सुनावली. कोर्टाच्या बाहेर पडताना मात्र कार्येकर नाचतच बाहेर पडले!

कार्येकर खडबडून जागे झाले. अरोपीचा पिंजरा त्यानी स्वप्नातही कल्पिला नव्हता, त्याच पिंजऱ्यात आज पहाटे पहाटे त्यांनी स्वत:ला बघितले होते. त्यांना स्वप्नाचा अर्थ कांही लागे ना. त्यांचा नातू त्याना येऊन बिलगला. त्याने विचारले अजोबा टेढी उंगली म्हणजे काय हो? सोसायटीत ड्रेनेज चोकअप झाले होते. बरच मोठं काम होतं. कार्येकरांनी तीन कोटेशन्स मागवली. त्यातल्या एका बे-भरवशाच्या माणसाला त्याचे दर चढे असताना देखील काम दिले. त्याच्याकडून बरीच रक्कम अगाऊ आपल्या खात्यात वळती करून घेतली. आणि हे गुपित षटकर्णी व्हायची व्यवस्था केली. या बाणाने निशाणा साधला. संकुलात चर्चेला उधाण आले. प्रथम ती दबक्या आवाजात मग उघडपणे कुजबुजू लागली. विरोधी गटातील सभासदांनी खास AGM ची मागणी केली. कार्येकरांवर आरोपांच्या फैरी झडल्या. आरोपांचे बालंट लागल्यामुळे कार्येकरांचा राजीनामा कार्यकारिणीला मंजूर करावाच लागला. राजीनाम्या-सोबत त्यानी त्यांच्या खाती बेभरवशाच्या माणसाकडून घेतलेल्या रक्कमेचा धनादेश जोडलाच होता. कार्येकर सभेतून बाहेर पडले. एक दीर्घ श्वास घेऊन सुटल्याचा आनंद त्यांनी साजरा केला. 'टेढी उंगली' आणि त्यांना पडलेल्या स्वप्नाचा अर्थ त्यांना समजला होता.

**– कौस्तुभ ताम्हनकर,** ९८१९७४५३९३

# सोपानदेवांची ‘अलौकिक सोपानदेवी’

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचित आहोत.

– व्यवस्थापक

**अध्याय २ : सांख्ययोग**

**अर्जुन उवाच ।**

सुखदु:खे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।
ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यासि ।।

**सुख दु:ख सम करूनी ।**
**लाभालाभ न घरी मनीं।**
**जयो अपजयो सांडुनी ।**
**युद्ध करी पाप नाहीं ।।३८।।**

एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धियोंगे त्विमां श्रृणु ।
बुद्ध्या युक्तो यया पार्थ कमबन्धं प्रहास्यसि ।।

**हे बुद्धि सांख्यमतीची सांगितली ।**
**योगाभ्यासें जे बोलिली ।**
**तें तुज अर्जुना सांगणें भली ।**
**तेणें बंधन तुटेल कर्माचें ।।३९।।**

नेहभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते ।
स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।।

**कर्में निष्काम लागती सोसणे ।**
**प्रत्यवाय नव्हे बोधणे ।**
**थोड्याचि धर्माची कारणे ।**
**भय महा तसिल ।।४०।।**

व्यवसायात्मिका बुद्धि: एकेह कुरुनन्दन ।
बहुशाखा ह्यनन्ताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ।।

**व्यवसायात्मिक बुद्धि निश्चिती ।**
**निष्काम परमेश्वरी भजन अर्पिती ।**
**बहु शाखाफळा ते इच्छा करिती ।**
**ते बुद्धि अशेष सांडी अज्ञानाची ।।४१।।**

यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्त्यविपश्चित: ।
वेदवादरता: पार्थ नान्यदस्तीति वादिन: ।।

**वेदवाचा असे पुष्पित ।**
**कर्मफळास्तव करूनी सांगत ।**
**तेचि अज्ञानिया निश्चित ।**
**कामना इच्छुनी करिती कर्मे ।।४२।।**

कामात्मान: स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् ।
क्रियाविशेषबहुलां भोगैश्चर्यगतिं प्रति ।।

**सकामबुद्धि कर्में आचरती । स्वर्गसुखातें पावती ।**
**पुण्यसामोग्री सरलिया अंती ।**
**मागुती येती लोकी ।।४३।।**

भोगैश्चर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम् ।
व्यवसायात्मिका बुद्धि: समाधौ न विधीयते ।।

**भोग ऐश्वर्य मनी धरूनी । कर्मे नानापरीचीं करूनी।**
**मनोरथ होताती म्हणोनी । अशक्त जाले तेथें।।४४।।**

त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ।
निर्द्वन्द्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ।।

**त्रिगुणात्मक वेद जाण ।**
**होई अर्जुना निर्गुणा निर्गुण।**
**सत्वीं राहे द्वंद्व तोडून ।**
**आत्मतत्त्वीं असोनी ।।४५।।**

## शब्दकोडे माहे जुलैं २०२२

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | X | ५ | |
| ६ | | X | ७ | | ८ | | X |
| ९ | | १० | X | ११ | | | |
| | X | १२ | १३ | X | १४ | | X |
| X | १५ | | | १६ | | X | १७ |
| १८ | | X | १९ | | X | २० | |
| | X | २१ | | | | | X |
| २२ | २३ | | X | | X | २४ | २५ |
| X | | X | २६ | | | X | |

**<u>आडवे शब्द</u> :**

१.पाण्याच्या दोन मोठ्या भागांना जोडणारी पाण्याची चिंचोळी पट्टी, ५. 'रहस्य'ला हिंदी प्रतिशब्द, ६. धुळीचा कण, रेणू, ७. हिराचा झाडू, ९. डुक्कर, विष्णूचा तिसरा अवतार, ११. श्वापद, पशु, १२. नूतन, नवीन, १४. व्रत, नेम, १५. अरण्यातील पाऊलवाट, १८. कान, १९. एक संख्याविशेष, लाखेची कीड, या किड्यांपासून मिळणारा पदार्थ, २०. बुद्धिबळे खेळण्यासाठी घरे पाडून तयार केलेले वस्त्र, २१. लग्नप्रसंगी वधू-वरांमध्ये धरावयाचे आडवे वस्त्र, २२. चांदी, कोणत्याही गोष्टीचा २५ वर्षे झाल्यावर साजरा करण्याचा महोत्सव, २४. साथीच्या रोगाच्यावेळी टोचायचे औषध, २५. घराचे गेट.

**<u>उभे शब्द</u> :**

१. एक प्रकारची बैलगाडी, २. लवून केलेला नमस्कार, ३. मुऱ्हे, धुई, ४. कमळ, सरोज, ५. अंत:पूर, जनानखाना, ८. न्यायाधीशापुढील फिर्यादीचे वाचन, १०. हत्या, वध, १३. सोक्षमोक्ष, फैसला, १५. रंग, १६. रुक्ष, शुष्क, १७. डोंगर ओलांडण्यासाठी बनवलेला वळणावळणाचा रस्ता, १८. कापूर, २० पडदा, २१. शेवट, २३. एखादा सण किंवा ग्रामदेवतेचा उत्सव पंचक्रोशीतील लोकांनी एकत्र येऊन साजरा करण्याची पद्धत, मेळा, २५. साप.

**– सौ. मधुरा संतोष शिधये,**
मोबा.९८१९७७०९७०

## सांगा पाहू?

१. सलीम दुराणी या क्रिकेटपटूने परवीन बाबी या अभिनेत्रीबरोबर बी.आर.इशारा यांच्या कोणत्या चित्रपटात नायकाची भूमिका केली?
२. हिंदू-मुस्लिम एकतेचे समर्थक असलेल्या मौलाना अबुल कलम आजाद यांनी १९१२ साली कोणते उर्दू भाषिक साप्ताहिक सुरू केले?
३. बेरियमचे कोणते संयुग औषधात वापरतात?
४. 'आईस्क्रिम पार्लर' ला इटलीत काय म्हणतात?
५. तंबाखूच्या पानांवर पिवळसर ठिपके निर्माण करणाऱ्या रोगाचे नाव काय?
६. मेंदूतील कोणत्या द्रव्यामुळे मुलांच्या मनात आई-वडिलांच्या शांत, प्रेमळ संवादांमुळे विश्वास निर्माण होतो?
७. 'देश' आणि त्या देशांमध्ये होणारे 'फेस्टिव्हल' यांच्या जोड्या जुळवा.

| फेस्टिव्हल | देश |
|---|---|
| १) चेरी ब्लॉसम फेस्टिव्हल | १) चायना |
| २) हरमिन्स फेस्टिव्हल | २) स्पेन |
| ३) लँटर्न फेस्टिव्हल | ३) भारत |
| ४) टोमॅटिनो फेस्टिव्हल | ४) जपान |
| ५) फेस्टिव्हल ऑफ लाईटस् | ५) थायलंड |

(उत्तरे अन्यत्र पहा.) **– सौ. मधुरा संतोष शिधये,**
मोबा.९८१९७७०९७०

### शब्दकोडे माहे जुलैंचे उत्तर

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ नि | २ ल | कं | ३ ठ | X | ४ प | ५ ग |
| ६ रां | ग | X | ७ सा | ८ र | व | ट |
| ९ ज | त | १० न | X | ११ का | न | X |
| न | X | १२ वा | १३ स | ना | X | १४ ना |
| X | १५ शो | X | जा | X | १६ फा | र |
| १७ सा | ध | १८ ना | X | १९ भू | X | क |
| व | X | २० रा | वा | X | २१ दा | त |
| २२ ज | हा | ज | X | २३ दौ | त | X |

**शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा**

# ज्ञानसूर्याची सावली

**(लेखांक सोळावा)**

'तर... तर ! मी आणि सोपानदादा ज्या ठिकाणी नेहमी खेळायचो, ज्या ठिकाणी बसून वाळूत घर बनवायचो... त्या ठिकाणी... त्या ठिकाणी या बांगड्या ठेवलेल्या सापडल्या. आ...ई... च्या बांगड्या आहेत या ! आईच ठेवून गेली असणार ! तिला माहित होतं की, मी आणि सोपान तिथं खेळायला येणार ! आणि आम्हाला त्या बांगड्या सापडणार. आणि तसंच झालं ! मला आईच्या बांगड्या सापडल्या. आऽऽई ! दादा, बांगड्या सापडल्या, आता आई सापडेल ना रे?'' असं विचारून मुक्ता पुन्हा रडायला लागली. सोपानाच्या डोळ्यांतून अश्रू ओघळले. त्यानं निवृत्ती-ज्ञानेशा कडं पाहिलं. त्यांचेही डोळे अश्रूंनी भरले होते. सोपानानं मुक्तीच्या हातातल्या बांगड्या घेतल्या. म्हणाला, ''मुक्ते, तू किती शहाणी आहेस गं? तुला बरोबर लक्षात आलं की, या आईच्या बांगड्या आहेत म्हणून ! दादा, बाबा आपल्याला शिकवायचे ना 'मातृ देवो भेव !' मग आता आपल्या आईची आठवण आणि तिला रोज वंदन म्हणून आपण या बांगड्या देवाच्या कोनाड्यात ठेवू या. म्हणजे या बांगड्यांमधून आईचे हात आपल्या नेहमी पाठीशी राहतील. होय ना दादा?'' विचारता-विचारता सोपानाला हुंदका आवरेना. निवृत्ती मात्र घायाळ मनाने सुन्न उभा होता. गंगेत आत्मसमर्पण करताना आईच्या मनाची घालमेलच जणू त्या बांगड्या त्याला सांगत होत्या. त्या बांगड्या काढून ठेवताना, त्या बांगड्यांच्या रूपात आपण आपल्या लेकरांच्या जवळ राहू, त्यांच्या नजरेसमोर राहू, असा विचार त्या माउलीच्या व्याकूळ मनात आला असेल, असे वाटून निवत्तीच्या घशात आवंढा दाटून आला, तर हेच विचार ज्ञानेशाच्या मनात घोळत होते. त्यालाही भरून आलं; पण या व्याकूळ प्रसंगातून बाहेर पडणं आवश्यक होतं. नाहीतर हळूहळू मुक्तीनं सगळ्यांनाच रडवलं असतं. आपले भरलेले डोळे तसेच ठेवून चेहऱ्यावर ओढून-ताणून हसू आणून ज्ञानेश्वर म्हणाला, ''मुक्ते, अगं वेडाबाई मी सांगतो तुला ! आईने त्या बांगड्या तुझ्यासाठी ठेवल्या असणार. आता तू मोठी होणार. तुझे हात पण मोठे होणार. मग त्या बांगड्या तुझ्या हाताला येतील. निवृत्तीदादा, आता या नकटीला रोज खीर पाजावी लागणार हं ! तरच ती लवकर मोठी होईल. होय ना रे सोपाना?'' ज्ञानेशानं वातावरण बदलण्याचा प्रयत्न केला. त्याचं ते केविलवाणं हास्य बघून त्यापेक्षा हा रडला असता, तर बरं झालं असतं, असं निवृत्तीला वाटलं; पण ज्ञानेश्वर मुक्तीला हसवण्याचा प्रयत्न करतोय, हे त्याच्याही लक्षात आले. त्यानंही उसनं अवसान आणलं. म्हणाला, ''हो तर ! आणि मला खीर करता येते बरं का ! मुक्ते, नू नुसतं हो म्हणायचं, की मी लगेच खीर करून देतो किनई बघ!'' निवृत्तीच्या या बोलण्यावर मुक्तीनं डोळे पुसत मान डोलावली. तोच सोपान म्हणाला, ''अहो, मुक्ताबाई, ऐट आहे बुवा एका माणसाची ! आता काय खीर खाणार म्हणे! आम्हाला द्याल ना थोडीशी? आणि हो ! आजचा दिवस या गरीब भावांनी मागून आणलेली माधुकरी गोड मानून घ्यावी, ही विज्ञापना !'' सोपानाचा तो अविर्भाव बघून मुक्ती खुदकन हसली आणि भर दुपारी त्या झोपडीत चांदणं पसरलं ! तिच्या हसण्यानं सगळ्यांच्या मनावरचं मळभ दूर झालं ! चौघंही हसायला लागले. हसता-हसता एकमेकांच्या गळ्यात पडायला लागले. पोट धरून हसायला लागले. हसून-हसून मुक्तीच्या पोटात दुखायला लागलं. या तिघांना मात्र हसून-हसून आपल्या डोळ्यांत पाणी आलंय की डोळ्यांतलं

पाणी दिसू नये, म्हणून आपण हसतो आहोत, असा संभ्रम पडला होता.

वातावरण निवळलं ! निवृत्ती-ज्ञानेशानं आपापल्या झोळ्या उघडल्या. त्यात माधुकरी होती. मुक्तीने पटकन तीन-चार गाडगी आणली. झोळीला आत कप्पे होते. त्यात वेगवेगळं धान्य पसापसा पडलं होतं. कुणी तांदूळ दिले होते, तर कुणी ज्वारी, कुणी कुळीथ, तर कुणी कोरटे. निवृत्तीच्या झोळीत असा कोरडा शिधा होता. कारण तो इतर आळ्यांतून फिरला होता; पण ज्ञानेश्वराच्या झोळीत दोन-चार भाकरीचे तुकडे, दोन ढेकळं भाताची आणि एका द्रोणात कसलीशी भाजी, असा ओला शिधा होता. कारण तो ब्राह्मण आळीत फिरला होता. असे दोन वेगवेगळे प्रकार बघून मुक्तीला नवल वाटलं ! तिने विचारलं, ''दादा, असा कोरडा शिधा आणि ओला शिधा का रे?'' तिच्या प्रश्नाचं काय उत्तर द्यावं, हे निवृत्तीला कळेना. मग उत्तर दिलं, ज्ञानेश्वराने –

''मुक्ते, निवृत्तीदादा गेले होते इतर आळ्यांतून! आपल्याला ब्राह्मण मानून त्यांनी कोरडा शिधा दिला; पण मी गेलो होतो ब्राह्मण आळीत. आपल्याला बहिष्कृत, ब्राह्मणेतर मानून त्यांनी हा असला शिधा दिला. मुक्ते, आपलं ब्राह्मणत्व बहुजनांनी जेवढं मान्य केलंय, तेवढं ब्राह्मणांनीसुद्धा नाही ! म्हणून हा शिधा असा वेगवेगळा आहे.''ज्ञानेश्वरानं जे सांगितलं, ते मुक्तीला किती कळलं कुणास ठाऊक? पण माधुकरी मागायला गेला असता झालेल्या अपमानानं त्याच्या मनाला जी जखम झाली होती, ती अजूनही ठसठसत होती, हे सोपानाच्या मात्र लक्षात आलं. आता पुन्हा वातावरण गढूळायला लागलं होतं. निवृत्तीनं सावरलं, ''चला चला, आपण ज्ञानेशानं आणलेला ओला शिधा संपवू या आणि कोरडा भरून ठेवू. त्याचं काय काय करायचं, ते नंतर बघू. चला आता !'' मुक्ती उत्साहानं उठली. सोपानही उठला; पण ज्ञानेश्वर तसाच बसून राहिला. उठता-उठता सोपानाच्या ते लक्षात आलं. ''ज्ञानादादा, या पूर्णब्रह्माला यज्ञकर्म समजून ग्रहण करू या ! चल !'' सोपानाच्या बोलण्याने ज्ञानेश्वर भानावर आला. उठून तोही आत गेला. मुक्तीने तोवर चार खापऱ्या मांडल्या होत्या. तीत एकेक भाताचे ढेकूळ, त्यावर उलीशी भाजी आणि एकेक कोर भाकरी असं सगळं सोपानानं वाटून घेतलं. त्या घासभर जेवणावर पोटभर पाणी पिऊन सगळ्यांनी पोटं भरून घेतली, पण ते खाता-खाता निवृत्ती-ज्ञानेश्वर आणि सोपान तिघांच्याही मनात एकच विचार घोळत होता. त्यांना मार्ग सापडला होता. जगण्यासाठी, देह जगवण्यासाठी, जिवंत राहण्यासाठी अन्न मिळणं गरजेचं होतं आणि ते मिळवण्यासाठी हा माधुकरीचा मार्ग दिसला होता. निदान मुक्ता थोडी मोठी होईपर्यंत तरी हे करणं गरजेचं होतं. विचार करता-करता सोपानाचं लक्ष मुक्तीकडे गेलं. आपल्या चिमुकल्या हातानं बोटात मावेल तेवढा घास उचलून खाण्याचा ती प्रयत्न करीत होती, पण घास तोंडात जाईपर्यंत निम्मा खाली पडत होता. सोपाना पुढे झाला आणि त्यानं मुक्तीला भरवायला सुरुवात केली. मग मात्र भुकेजली मुक्ता पटापटा जेवू लागली. सोपानाने आपल्याही वाटचा भात तिला भरवला. आपण घेत असलेला घास खारट का लागतोय, मुळातच त्यात सैंधव जास्त झालंय, की त्या घासात आपल्या डोळ्यांतून वाहणारे, गालांवरून ओघळणारे अश्रू मिसळताहेत, याचा उलगडा मात्र निवृत्ती-ज्ञानेशाला झाला नाही. ते खारट लागणारं अन्न त्यांनी तसंच खाल्लं ! अन्न एवढंसं असूनदेखील आपलं पोट आणि मन तृप्त आहे. समाधानी आहे, याचं कारण खरंच ते अन्न पुरेसं होतं, की सोपानानं मुक्ताला भरवलेलं बघून आणि मुक्ताचं पोट भरल्याचं बघून हे समाधान आपल्याला लाभलं आहे, याचं उत्तर मात्र दोघांनीही शोधलं नाही. यापुढे असे अनेक प्रश्न पडणार होते. त्या सगळ्यांची उत्तरं मात्र मिळतीलच, याची खात्री नव्हती. काही प्रश्न काळावर सोडून द्यावे लागणार होते आणि काही प्रश्न निरुत्तर राहणार होते. या प्रश्नासारखे. पोट भरल्याच्या आनंदात खापऱ्या उचलणाऱ्या मुक्तीकडे निवृत्ती-ज्ञानेश्वर पाहत बसले. सोपान मात्र त्या दोघांकडे आळीपाळीनं बघत त्यांचं मन वाचण्याचा प्रयत्न करत होता, त्याच्या आईसारखा. (क्रमश:)

**– सौ. मंजुश्री गोखले,**

मो. ८८०५३५५२००

# श्रीधान्यांना शरण जायला हवे !

२०२३ हे जागतिक श्री धान्य वर्ष तथा पोषक धान्य वर्ष (International millet year) असे घोषित झाले आहे. यामध्ये एकूण ११ श्री धान्ये जागतिक आरोग्य संघटनेने (W.H.O.) गृहीत धरली आहेत. त्यापैकी नऊ धान्य भारतातील आहेत ही गोष्ट आपल्याला नक्कीच अभिमानास्पद आहे. ही ११धान्ये पुढील प्रमाणे आहेत. १. ज्वारी, २. बाजरी, ३. नाचणी, ४. भगर (वरीचे तांदूळ), ५. राळे , ६. कोदु (कोदो), ७.कुटकी, ८. हरी कंगनी आणि ९ छाना. या नऊ धान्यांपैकी पहिली पाच तर महाराष्ट्रात सहजासहजी उपलब्ध आहेत.

सर्वसामान्यपणे या श्रीधान्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यामध्ये शरीराला पोषक असे महत्त्वाचे घटक म्हणजे तंतुमय पदार्थ, जीवनसत्त्वे, कॅल्शिअम, लोह इत्यादी महत्त्वाचे क्षार भरपूर प्रमाणात असतात. तसेच या धान्यांमध्ये असणारी साखर सावकाशपणे रक्तात मिसळत असल्याने रक्तातील साखर वाढत नाही. तसेच त्यामुळे शरीरात सुस्तपणा न येता तरतरी राहते.यातील तंतूमय पदार्थांमुळे शौचास साफ होते .तसेच वजनही वाढत नाही .त्यामुळे मधुमेह आणि उच्च रक्तदाब यांचा धोका सुद्धा कमी होतो. आज-काल आपला देश सर्व जगामध्ये स्थूलत्व, उच्च रक्तदाब, हृदयविकार आणि मधुमेह या विकारांच्या बाबतीत अग्रेसर आहे. ही बाब नक्कीच खेदकारी आणि भयावह आहे. वरील विकार टाळण्यासाठी आपल्या आहारात श्रीधान्यांचा समावेश आवश्यकच आहे. आज-काल न्याहरीच्या निमित्ताने सेवन केल्या जाणाऱ्या इडल्या, आप्पे, डोसे, विविध प्रकारचे भात, यांमुळे तांदुळाचा आहारात जास्त वापर केला जातो. आयुष्य वेगवान झाल्यामुळे करायला सोपी आणि खायला सुद्धा सोयीस्कर अशा चपाती तथा पोळीचे आहारातील प्रमाण वाढलेच आहे. पुरी भाजी हा सुद्धा हॉटेलमध्ये बऱ्याच वेळा खाल्ला जाणारा पदार्थ शरीराला अधिकच उष्मांक देत असतो. त्यामध्ये स्निग्ध पदार्थांचेही प्रमाण बरेच जास्त होत असल्यामुळे स्थूलत्व आणि हृदयरोग यांच्या दृष्टीने वरचेवर अशा प्रकारच्या आहाराचे सेवन करणे आरोग्याच्या दृष्टीने योग्य नाही. म्हणून घरी सेवन केलेल्या आहारामध्ये मुख्यतः ज्वारी, बाजरी, नाचणी यांचा तसेच राळे आणि वरीचे तांदूळ यांचा सुद्धा वरचेवर समावेश असणं आवश्यक आहे. आपल्याकडे उपवासासाठी वरीचा भात खाण्याची पद्धत आहेच ती चांगलीच आहे .उपवासासाठी साबुदाण्यापेक्षा वरीचा आहारामध्ये उपयोग करणे केव्हाही आरोग्याच्या दृष्टीने चांगलंच आहे.

साबुदाणा या पदार्थाचा उपवासाच्या पदार्थांमध्ये समावेश कसा आणि कधी झाला याची कल्पना नाही. परंतु आरोग्याच्या दृष्टीने साबुदाणा हा चांगला अन्नपदार्थ नक्कीच नाही. साबुदाण्यामुळे केवळ रक्त शर्करा वाढते बाकी त्यामध्ये तंतुमय पदार्थ, लोह, खनिजे इत्यादी पदार्थांचे प्रमाण शून्यच आहे. शिवाय साबुदाणा पचायला जड आहे हे तर वेगळेच. एवढं असलं तरी सर्वसाधारणपणे उपवास म्हटल्यावर साबुदाण्याचा प्रथमतः विचार केला जातो. उपवास करण्यामागे आरोग्य रक्षण हाच हेतू आपल्या पूर्वजांचा, शास्त्रकर्त्यांचा होता.परंतु तो हल्लीच्या रूढ उपवासाच्या पद्धतीने दुर्लक्षिला जाऊ लागला आहे. उपवास करा किंवा न करा परंतु वरीच्या धान्याचा समावेश किमान आठवड्यातून एकदा तरी अवश्य सर्वांनी करावा हे केव्हाही चांगलेच. न सडलेल्या वरीच्या धान्याच्या पिठाच्या भाकरी चांगल्या चविष्ट लागतात. अशा स्वरूपात म्हणजे न सडलेल्या स्वरूपात हे धान्य वापरणे केव्हाही चांगले. उपवासाच्या भाजणीसाठी वरीचे पीठ तसेच राजगिऱ्याचे पीठ आणि साबुदाण्याच्या ऐवजी उकडलेला बटाटा वापरून याचे थालीपीठ करता येईल.

राळे हे धान्य संक्रांतीच्या दिवसाच्या पूर्वी भोगीच्या दिवशी वापरण्याची पद्धत आहे. भोगीच्या

दिवशी राळ्याचा भात किंवा मूग डाळ घालून केलेली खिचडी केली जाते. हिवाळ्यामध्ये भूक प्रखर असते. त्यामुळे या दिवसात पोट भरल्याचे समाधान देणारे राळे आहारात वरचेवर अवश्य असावेत. केवळ पोट भरण्याचे समाधान म्हणून नव्हे तर यात तंतुमय पदार्थ, लोह, कॅल्शियम असे शरीराला अत्यंत उपयोगी असे महत्त्वाचे अन्नघटक भरपूर प्रमाणात असतात.

बाजरी सुद्धा हिवाळ्यामध्ये उपयोगी असे एक उत्तम तृणधान्य आहे. बाजरीमध्ये उष्मांक भरपूर तर मिळतातच याशिवाय लोहाचे आणि तंतुमय पदार्थांचे सुद्धा प्रमाण भरपूर असते. बाजरी उष्ण गुणात्मक असल्यामुळे शक्यतो हिवाळ्यात खावी .उन्हाळ्यात खायचे झाल्यास ज्वारी सोबत मिसळून खाणे चांगले.

हाडांच्या मजबुतीसाठी लागणारे कॅल्शियम नाचणीमध्ये भरपूर असल्याने वरचेवर याचा समावेश आपल्या आहारात असावा. आपल्याकडे पूर्वी लहान मुलांना नाचणीच्या सत्त्वाची खीर दिली जात असे .दांत चांगल्या प्रकारे येण्यासाठी याचा नक्कीच उपयोग होतो. नाचणीच्या भाकरीने भूक लवकर लागते, म्हणून ज्वारी सोबत नाचणीची भाकरी करायला हरकत नाही.

कोदु हे श्रीधान्य विशेषतः मध्य प्रदेशात आणि नर्मदा नदीच्या खोऱ्यात पिकविले जाते. त्या भागातील लोकांचे आहारात या धान्याचा प्रमुख धान्य म्हणूनच समावेश केला जातो .कोदुचा भात खूप शक्तीदायक असतो. असं त्या भागातील लोक सांगतात. अगदी कमी पाण्यात आणि सामान्य जमिनीमध्ये सुद्धा हे पीक भरपूर उत्पन्न देते. त्यामुळे आजकाल पुन्हा शेतकरी हे पीक घेऊ लागले आहेत. त्याला आता दरही चांगला मिळतो आहे. स्थूलत्व, मधुमेह, हृदयविकार आदि आधुनिक जीवनशैलीचा परिणाम असणाऱ्या व्याधींपासून आपल्याला स्वतःचा बचाव करायचा असेल तर या श्रीधान्यांना शरण जायलाच हवे. हो नां?

**– डॉ. सुश्मिता गाडगीळ**

मोबा. ९४२१२९०४७७

## मन...

असे गूढ वाडा हे मन माणसाचे
कळेना कधीही कुणाला कुणाचे,
म्हणती जरी सारे ओळखून आहे
परी सर्वस्वी ते अनोळखीच आहे...!

किती खोल आहे डोह मनाचा
परी विलंब नसे आठवांना क्षणाचा,
कधी आठवे गूढ गर्भातून काही
कधी मनाचे दार उघडत नाही...!

जरी दाटले या मनामध्ये काही
सहजीच ओठी ते उमटत नाही,
अनभिज्ञ चेहेराही वागे तयासी
म्हणे मनाला मी ओळखत नाही...!

नजरेची गूढता कधी सांगे काही
कधी अनोळखी भासे सर्व काही,
जरी आले पाणी नयनी कधीही
बहाण्यात हास्याच्या सांडून जाई...!

मनाच्या अंतरीचा हिशोब कळेना
कधी कोणा सहजी जागा मिळेना,
सदैव या मनावर भावनांचा पहारा
सुदैवी ठरे तो ज्यास लाभे सहारा...!

कुठे अंतरी असे आनंद ठेवा
कुठे आवेग दुःखाचा पसारा
किती खेळ खेळी मन हे मनाशी
स्वतःचे स्वतःसही उमगत नाही...!

**– मंदार पानवलकर.**

# लहान मुले नैसर्गिक पद्धतीने भाषा शिकू शकतात

## (लेखांक पाचवा)

संपदाने तिच्या सहा महिन्यांच्या प्रसूती रजेचा उपयोग अतिशय हुशारीने केला, तिचे बाळ साहिलसोबत वेळ घालवला. ती साहिलला स्तनपान देत होती, मॅथ डॉट कार्ड आणि इंग्रजी शब्द चार्ट वाचण्याचे प्रशिक्षण देत होती, कथा सांगणे, झोपेच्या वेळा समायोजित करणे, नियमित तेल मसाज आणि आंघोळ घालणे, त्यामुळे तिचे साहिलसोबत मजबूत संबंध निर्माण झाले. भारतीय परंपरेनुसार साहिलचे नामकरण, अन्नप्रसारण आणि पहिले केस कापणे (जावळ) नातेवाईक, मित्र आणि हितचिंतक यांच्या आशीर्वादाने साजरे करण्यात आले.

नवीन आजी आनंदी होत्या आणि प्रसूती नंतरच्या काळजीचे महत्त्व संपदाच्या मैत्रिणीना समजावून सांगत होत्या, 'आयुर्वेदात, ५००० वर्ष जुन्या भारतीय उपचार परंपरेत हा सहा महिन्यांचा कालावधी मातांसाठी, विशेषत: पचनसंस्थेसाठी एक संवेदनशील काळ मानला जातो – म्हणून यावर भर दिला जातो. त्यांना साधे, पचण्याजोगे पदार्थ खायला दिले जातात. पारंपरिकपणे मातांना दररोज गरम तेलाची मालिश केली जाते. त्यांना बरे होण्यासाठी, त्यांची प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आणि दुधाचा पुरवठा सुधारण्यासाठी अतिशय साधे पण विशेष खाद्यपदार्थ आणि अनेक हर्बल पेये दिली जातात.'

'माझ्या आजी आणि त्यांचे वंशज १० पेक्षा जास्त मुलांना जन्म देऊनही ९० वर्षे आणि त्याहून अधिक वयापर्यंत जगले. ते संधिवात, पाठदुखी, सांधेदुखी इत्यादी नेहमीच्या तक्रारींपासून मुक्त होते, कारण ते पारंपरिक बंदिस्त पद्धतींचे काटेकोरपणे पालन करत होते. माझा असा विश्वास आहे की मी माझ्या पिढीपासून ओळखत असलेल्या काही स्त्रियांना पाठीच्या, सांधे आणि ओटीपोटाच्या तीव्र आजारांनी ग्रासले आहे, ते त्यांची मुलं प्रीस्कूलमध्ये होती तेव्हापासूनच, एक अभावग्रस्त वृत्ती आणि प्राचीन गोष्टींबद्दलच्या संशयामुळे. त्यांच्या सध्याच्या आरोग्याच्या समस्यांपैकी बहुतेक प्रसूतीनंतरच्या काळात योग्य काळजी न घेतल्याने दिसून येतात.बाळंतपणानंतरचे पहिले सहा महिने स्त्रीच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा असतो, स्त्रीला मानसिक आणि शारीरिकरित्या बरे होण्यासाठी किमान सहा महिने लागतात हे वैद्यकशास्त्रही मान्य करते.'

इतर सर्व काळजी आजी-आजोबांनी घेतली तेव्हा संपदा आणि संतोष यांना त्यांच्या बाळाच्या प्रशिक्षणात चांगला वेळ घालवता आला. साहिलचा पहिला वाढदिवस मोठ्या थाटात साजरा करण्याची योजना होती. संतोषने बाळाची छायाचित्रे वापरून एक अद्भुत व्हिडिओ आमंत्रण तयार केले, जे ऑनलाइन शेअर केले जाऊ शकते. साहिलच्या वाढदिवसाचे आमंत्रण देण्यासाठी संपदा आणि संतोष यांनी वैयक्तिकरित्या फार कमी वृद्ध नातेवाईकांना भेट दिली. त्यांच्या एका भेटीत, त्यांना संतोषची चुलत बहीण सुधा भेटली. जी एका नामांकित शाळेत गणिताची शिक्षिका आहे. साहिलला मिळालेल्या प्रशिक्षणाबद्दल ऐकून सुधा उत्साहित झाली आणि तिने ५ वी आणि २ री इयत्तेत शिकणाऱ्या आपल्या मुलांना वैदिक गणित शिकवण्याचा अनुभव शेअर केला.

सुधा म्हणाली, आधी तिने अबॅकस, क्यूमॅथ इत्यादी प्रशिक्षणे शोधली पण शेवटी एक गणिताची शिक्षिका असल्याने तिने स्वतः वैदिक गणिताचे सौंदर्य जाणून घेतले आणि तिच्या मुलांची आणि शाळेतील मुलांसाठी ट्रेनर बनली. सुधाने स्पष्ट केले, वैदिक गणित हे अंकगणितातील क्रिया जलद आणि अधिक कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी प्राचीन युक्त्या आणि तंत्रांचा संग्रह आहे. वैदिक गणित वेदांमधून आले आहे, विशेषत: अथर्ववेद. अथर्ववेद हे अभियांत्रिकी, गणित, शिल्पकला, वैद्यकशास्त्र आणि इतर सर्व शास्त्र शाखांशी संबंधित आहे ज्याबद्दल आपण आज अवगत आहोत. १९११ ते १९१८ दरम्यान जगद्गुरू स्वामी श्री भारती कृष्ण तीर्थ महाराज यांनी वैदिक गणित पुनरुज्जीवित केले, त्यांची रचना १९६५ मध्ये वैदिक गणित नावाच्या पुस्तकात प्रकाशित झाली. त्यात फक्त

१६ सूत्रे आणि १३ उपसूत्रांचा समावेश आहे.

सुधा म्हणाल्या, ‘गणिताची पार्श्वभूमी असूनही, मला मानसिक अंकगणितात अडचण आली आणि कॅल्क्युलेटर वापरून गणना करणे यापेक्षा मी वैदिक गणित निवडले. वैदिक गणित हे अधिक कार्यक्षम आणि अचूक असल्याने गणिते मांडण्याचे उत्तम तंत्र आहे. दिवसातून ३० ते ४५ मिनिटे वैदिक गणिताचा सराव केल्याने कोणाचीही क्षमता चांगली होऊ शकते, झटपट मानसिक गणिते वाढू शकतात, जे स्पर्धा परीक्षांसाठी खूप उपयुक्त आहेत. पारंपरिक गणिताच्या अनेक पायऱ्यांच्या विरूद्ध वैदिक गणिते एका ओळीत उत्तरे देतात.

वैदिक गणित त्याच्या साधेपणासाठी प्रसिद्ध आहे; गणिते मानसिक गणिताद्वारे केली जाऊ शकतात आणि एका ओळीत उत्तरे वापरून जास्तीत जास्त गणना एका कागदावर करता येते. वैदिक गणिताच्या समस्यांचे निराकरण केल्याने मन, स्मरणशक्ती आणि फोकस तीक्ष्ण होते. याने सर्जनशीलता सुधारते आणि नवीनतेला प्रोत्साहन देते. यामुळे मला खरोखरच वैदिक गणित शिकण्याची आणि शिकवण्याची प्रेरणा मिळाली.’

संतोष, संगणक अभियंता असल्याने त्याला वैदिक गणिताच्या वापराची गरज आणि महत्त्व माहित होते. वैदिक गणित शिकण्यास आणि शिकवण्यास सुधा किती उत्कट आहे हे जाणून संतोषने सुधाला तपशीलात जाण्यास सांगितले आणि उदाहरणांसह काही तंत्रे देण्यास सांगितले जेणेकरुन तो पुढील काही वर्षांत वैदिक गणित स्वतः शिकेल आणि नंतर गणित करण्याची स्मार्ट पद्धत साहिलला शिकवेल, त्यामुळे आजच्या बहुतेक मुलांप्रमाणे साहिल कधीही गणिताला घाबरणार नाही.

उत्तेजित सुधाने संतोषला स्टेट कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग (SCERT), नवी दिल्ली यांनी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत प्रकाशित केलेले वैदिक गणिताची मूलतत्त्वे आणि अनुप्रयोग वाचण्यास सांगितले, जे शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी सरावासाठी भरपूर उदाहरणे असलेले सर्वात सोपे पाठ्यपुस्तक आहे. सुधा यांनी संतोषला काही सोप्या युक्त्या समजावून सांगितल्या, ज्या कोणत्याही व्यक्तीला वैदिक गणित शिकण्यास प्रवृत्त करू शकतात. सुधाने नैसर्गिक संख्येचा वर्ग शोधण्याच्या सोप्या पद्धतीने सुरुवात केली – अगदी तीन अंकी संख्यांचा वर्ग एका ओळीत शोधता येतो.

**पद्धत १ : ५ ने समाप्त होणारी संख्या.**

**सूत्र वापरा: एकाधिकेण पूर्वेण - मागील एकापेक्षा एकाने अधिक**

५ ने समाप्त होणाऱ्या कोणत्याही संख्येचा वर्ग कसा शोधायचा हे शिकण्यासाठी १२५ या संख्येचे विचार करू. १२५ ला २ भागात १२/५ असे लिहा. आपल्याला माहित आहे की, ५ चा वर्ग २५ आहे. वर्गाचा पहिला भाग शोधण्यासाठी आपल्याला १२ आणि त्याच्या पुढील संख्येचा (१२ + १) गुणाकार करावा लागेल. जो १२ × १३ = १५६ आहे. आता दोन भाग एकत्र केल्यास आपल्याला उत्तर मिळेल.

$(12/5)^2 = 12\ (12+1)/5^2 = 12 \times 13/25 = 156/25 = 15625$

अशाप्रकारे १२५ चा वर्ग १५६२५ आहे आणि फक्त एका ओळीत १२५ अशा मोठ्या संख्येचा वर्ग आपण शोधू शकतो.

सामान्य सूत्र $(n/5)^2 = n \times (n+1)/5^2$ आहे.

या सूत्राचा वापर करून, आपण एका थेट चरणात खालीलप्रमाणे वर्ग लिहू शकतो:

$25^2 = (2/5)^2 = 2\times(2+1)/5^2 = 2\times3/25 = 625$

$65^2 = (6/5)^2 = 6\times(6+1)/5^2 = 6\times7/25 = 4225$

$105^2 = (10/5)^2 = 10\times(10+1)/5^2 = 10\times11/25 = 11025$

$295^2\ (29/5)^2 = 29\times(29+1)/5^2 = 29\times30/25 = 87025$

**पद्धत २: बेस जवळील संख्या**

**सूत्र वापरा : युवदुनम् तावदुनिकृत्य वर्गमच योजयेत्** - पायापासून विचलनाने संख्या वाढवा आणि विचलनाचा वर्ग प्रत्यय लावा.

या तंत्राचा वापर बेस १०, १००, १००० इत्यादी जवळील संख्येचे वर्ग शोधण्यासाठी केला जाऊ शकतो. १०० च्या जवळ असलेल्या ९७ चा विचार करू. १०० पासून ९७ चे विचलन d = (९७–१००) = –३ आहे. ९७ चा वर्ग शोधताना हे विचलन अतिशय महत्त्वाचे आणि उपयुक्त आहे. पद्धती १ प्रमाणे, आपण ९७ क्रमांक लिहितो त्याचे विचलन १०० वरून ९७/(–३) चा वर्ग दोन अंकांमध्ये ०९ लिहावा लागेल. पुढे वर्गाचा पहिला भाग

शोधण्यासाठी फक्त जोडा संख्या आणि विचलन $97 + (-3) = 97-3=94$. आता दोन भाग एकत्र करून ९७ चा वर्ग $97^2 = (97-3)/(-3)^2=94/09= 9409$ असे लिहू.

फक्त एका ओळीत या तंत्राचा वापर करून बेसच्या जवळ असलेल्या मोठ्या संख्येचा वर्ग शोधणे खूप सोपे आहे. वर्गाचा पहिला भाग शोधण्यासाठी संख्येमध्ये योग्यरित्या जोडलेल्या नकारात्मक किंवा सकारात्मक चिन्हांसह विचलन घेणे महत्त्वाचे आहे.

पुढे मूळ मुल्यापेक्षा जास्त असलेली संख्या १०६ घेऊ. १०६ चा वर्ग शोधण्यासाठी विचलन d = १०६–१०० = ६ लिहा. आता $106^2 = (106+6) /(+6)^2 = 112/36 = 11236$

बेसपासून d विचलनासह n संख्येच्या सामान्य वर्गात $n^2 = (n+d) / d^2$ असे लिहिता येते. येथे $d^2$ मध्ये बेसमध्ये जितके शून्य आहेत तितके अंक लागतील.

$97^2$ शोधण्यासाठी $n =97$, $d=97-100=(-3)$ नंतर $97^2 = (97 - 3) / (-3)^2 = 9409$.

$94^2$ शोधण्यासाठी $n=94$, $d=94-100=(-6)$ नंतर $94^2 = (94 - 6) / (-6)^2 = 88/36 = 8836$

$106^2$ शोधण्यासाठी $n=106$, $d=106-100=(6)$ नंतर $106^2 = (106 6) / (6)^2 = 11236$.

जर तुम्ही ९८, ९३, १०४, १०७, ९९७, १००२ सारख्या पायाजवळील काही संख्या घेतल्या आणि या तंत्राचा वापर करून त्यांचे वर्ग शोधण्याचा सराव केला तर तुम्हाला असे दिसेल की, हे तंत्र शाळेत शिकलेल्या लांब गुणाकारापेक्षा खूप सोपे आहे.

सुधा म्हणाली, तुम्हाला वैदिक गणित पद्धतीने मोठ्या संख्येचे वर्ग शोधण्यासाठी लागणारा वेळ पहा आणि तुमच्या मित्राला नेहमीच्या पद्धतीने ते करायला सांगा आणि तुमच्या दोघांच्या वेळेची तुलना करा. हे जाणून घेणे आश्चर्यकारक असेल, शालेय पद्धत वापरणाऱ्या तुमच्या मित्राला जास्त वेळ लागेल, चुका होण्याची अधिक शक्यता असेल पण तुम्ही ते अधिक जलद, मुख्यतः अचूक आणि कमी त्रासात कराल.

जलद गणिताच्या या सोप्या आणि मनोरंजक पद्धती ऐकून संतोषने स्वतः वैदिक गणित शिकायचे आणि नंतर त्याचा मुलगा साहिलला हे स्मार्ट मार्ग शिकवायचे ठरवले.

**– इंद्राणी केळकर,** मोबा. ९१६४६८५०६७

## सांगा पाहू उत्तरे

१. सलीम दुराणी या क्रिकेटपटूने परवीन बाबी या अभिनेत्रीबरोबर बी.आर.इशारा यांच्या ‘चरित्र’ या चित्रपटात नायकाची भूमिका केली होती.

२. हिंदू-मुस्लिम एकतेचे समर्थक असलेल्या मौलाना अबुल कलम आजाद यांनी १९१२ साली ‘अल हलाल’ हे उर्दू भाषिक साप्ताहिक सुरू केले.

३. बेरियमचे ‘बेरियम सल्फेट’ हे संयुग औषधात वापरतात.

४. ‘आईस्क्रिम पार्लर’ ला इटलीत ‘जलातेरिया’ म्हणतात.

५. तंबाखूच्या पानावर पिवळसर ठिपके निर्माण करणाऱ्या रोगाचे नाव आहे ‘मोझॅक’ रोग.

६. मेंदूतील ‘ऑक्सिटोसिन’ द्रव्यामुळे मुलांच्या मनात आईवडिलांच्या शांत, प्रेमळ संवादामुळे विश्वास निर्माण होतो.

७. जोड्या जुळवा.

| फेस्टिव्हल | देश |
|---|---|
| १. चेरी ब्लॉसम फेस्टिवल | जपान |
| २. हरभिन्स फेस्टिव्हल | चायना |
| ३. लॅंटर्न फेस्टिव्हल | थायलंड |
| ४. टोमॅटिनो फेस्टिव्हल | स्पेन |
| ५. फेस्टिव्हल ऑफ लाईटस् | भारत |

**– सौ. मधुरा संतोष शिधये,**
मोबा. ९८१९७७०९७०


**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**

# गोखले ब्रदर्स

## सराफी दुकान

**गुरुवार, दि. 25 ऑगस्ट**
**गुरुपुष्यामृत**

**आपलं दुकान**
**महाद्वार रोडवर,**
**0231–2546585**

# गोदावरी परिक्रमा

गोदावरीचा महाराष्ट्रातील प्रवास संपला असला तरीही विदर्भातील अनेक उपनद्या गोदावरीला जाऊन मिळतात. त्यामुळे विदर्भातील नद्यांचे खोरे हे गोदावरीच्या खोऱ्याचाच भाग आहे. त्याचाही थोडक्यात आढावा घेणे महत्वाचे आहे. विदर्भातील पैनगंगा, वैनगंगा व वर्धा या प्रमुख उपनद्या म्हणता येईल. पैनगंगेचा उगम हा बुलढाणा जिल्ह्यात अजिंठा डोंगररांगात होतो. बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर हे तालुक्याचे ठिकाण पैनगंगेच्या तीरावर वसले आहे. तेथील कंचनी महल प्रसिद्ध आहे. पुढे पैनगंगा ही वाशीम जिल्ह्यात प्रवेश करते. जिल्ह्यातील वाशीम आणि रिसोड या दोन तालुक्यात पैनगंगेवर तब्बल ११ बंधारे बांधून सिंचन व्यवस्था निर्माण केली आहे. पुढे हिंगोली-यवतमाळ जिल्ह्याच्या सीमेवर इसापूर धरण बांधण्यात आले आहे. ह्या धरणामुळे विदर्भ आणि मराठवाडा सीमावर्ती भागाला बराच फायदा झाला आहे. पैनगंगा नदी नांदेड-यवतमाळ जिल्ह्याची सीमा बनत आपले मार्गक्रमण करत पुढे जाताना यवतमाळच्या उमरखेड तालुक्यात पैनगंगा नदीवर विलोभनीय असा सहस्रकुंड धबधबा आहे. नंतर यवतमाळ-चंद्रपूर जिल्ह्याची थोडीफार सीमा बनत जुगाद याठिकाणी पैनगंगा ही वर्धा नदीला जाऊन मिळते. विदर्भातील दुसरी महत्वाची नदी म्हणजे वर्धा नदी. मध्यप्रदेश मधील बैतुल जिल्ह्यातील मुल्ताई येथे सातपुडा पर्वतरांगेत उगम पावते. अमरावती जिल्ह्याच्या वरुड तालुक्यात ती महाराष्ट्र राज्यात प्रवेश करते. अमरावती-वर्धा जिल्ह्याची सीमा बनलेल्या वर्धा नदीवर मोर्शी तालुक्यात अप्पर वर्धा धरण बांधण्यात आले आहे. अप्पर वर्धा धरणामुळे मोर्शी-वरुड भागात मोसंबी व संत्र्यांची शेती मोठ्या प्रमाणात विकसित झाल्याने परिसराला विदर्भाचे कॅलिफोर्निया म्हटले जाते. पुढे यवतमाळ-वर्धा, यवतमाळ-चंद्रपूर जिल्ह्याची सीमा बनलेली वर्धा नदी सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे जुगाद येथे पैनगंगा नदीला सोबत घेत चंद्रपूर जिल्ह्यात प्रवेश करते. चंद्रपूर शहराच्या २० किमी दक्षिणेकडून वाहणाऱ्या याच वर्धा नदीच्या तीरावर बल्लारपूर शहर वसलेले आहे. बल्लारपूर शहर हे कागदनिर्मितीचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. पुढे चंद्रपूर-तेलंगणाच्या सीमेवर वर्धा नदीचा वैनगंगा नदीशी संगम होतो. त्यांनतर वर्धा आणि वैनगंगेच्या एकत्रित प्रवाहाला प्राणहिता नदी म्हणून ओळखले जाते. तत्पूर्वी वैनगंगा ही दक्षिणवाहिनी नदी सुद्धा मध्यप्रदेशमधील शिवणी जिल्ह्यात उगम पावते. मध्यप्रदेशमध्ये उत्तराभिमुखी असणारी वैनगंगा मात्र पेंच अभयारण्यापासून दक्षिणवाहिनी होते. बालाघाटमार्गे आलेली ही नदी गोंदिया जिल्ह्यातून महाराष्ट्रात प्रवेश करते.

गोंदिया जिल्ह्याच्या उत्तरेकडील सीमेनंतर ती भंडारा जिल्ह्यात प्रवेश करते. भंडारा शहर सुद्धा वैनगंगेच्या तीरावर वसलेले आहे. त्यांनतर चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्याची सीमा बनलेल्या वैनगंगा नदीचा पुढे तेलंगणाच्या सीमेवर वर्धा नदीशी संगम होऊन त्यांचा एकत्रित प्रवाह प्राणहिता नावाने ओळखला जातो. हीच प्राणहिता गडचिरोली आणि तेलंगणा राज्याची सीमा बनलेली आहे. तत्पूर्वी नांदेडपासून तेलंगणात गेलेली गोदामाय गडचिरोली जिल्ह्याच्या वेशीवर म्हणजेच सिरोंचाजवळ महाराष्ट्राच्या पुन्हा भेटीला येते. तेथेच प्राणहिता नदीचा गोदावरी नदीशी संगम होतो आणि ती गडचिरोली राज्याची दक्षिण सीमा बनते. त्याचबरोबर छत्तीसगढ मधून वाहत आलेली इंद्रावती नदी ही सुद्धा गडचिरोली आणि छत्तीसगढची आग्नेय सीमा होऊन ती सुद्धा गोदावरीला जाऊन मिळते. अशाप्रकारे गोदावरी नदी महाराष्ट्र राज्यातील प्रवास संपवून पुन्हा तेलंगणात प्रवेश करून पुढच्या प्रवासाला लागते.

पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे नांदेड जिल्ह्यातून तेलंगणा राज्यात प्रवेश केलेल्या गोदावरी नदी तीरावर निर्मल जिल्ह्यात बासर येथे प्रसिद्ध असे सरस्वती देवीचे मंदिर आहे. अनेक भाविक आपल्या लहान मुला-मुलींची शैक्षणिक प्रवासाची सुरुवात बासर येथील

सरस्वतीच्या देवीच्या पूजा व दर्शनाने करतात. त्या पूजेला अक्षर-अभ्यासम किंवा विद्यारंभ पूजा म्हणतात. पुढे निर्मल-निझामाबाद जिल्ह्यांची सीमा बनलेल्या गोदावरी नदीवर निझामाबाद जिल्ह्यात श्रीरामसागर धरण व जलविद्युत प्रकल्प बांधण्यात आला आहे. याला पोचमपडू प्रकल्प म्हणून सुद्धा ओळखले जाते. श्रीरामसागर धरणामुळे तेलंगणातील करीमनगर, आदिलाबाद, वारंगल, नालगोंडा आणि खम्मम जिल्ह्याला लाभ झाला आहे. श्रीरामसागर प्रकल्पातून बाहेर पडल्यानंतर गोदावरीचे पात्र विस्तृत दिसायला लागते. ती पुढे मंचेरिआल जिल्ह्यात प्रवेश करते. मंचेरिआल हे जिल्ह्याचे ठिकाण गोदावरीच्या तीरावर वसलेले आहे. मंचेरिआलनंतर गोदावरी नदी पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या भेटीला येते. गडचिरोली जिल्ह्याच्या वेशीवर गोदावरीचा प्राणहिता नदीशी संगम होतो. गडचिरोलीची दक्षिण सीमा होऊन गोदामाय पुढील प्रवासाला लागते. भद्राद्री कोठागुडम जिल्ह्यात आल्यावर गोदातीरावर भद्राचलम येथे धार्मिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या प्रसिद्ध असे श्री सीता रामचंद्रस्वामी मंदिर आहे. त्यामुळेच भद्राचलमला दक्षिण अयोध्या म्हणून सुद्धा ओळखले जाते.

पुढे काही अंतरावरच तेलंगणा राज्यातील प्रवास संपवून गोदावरी नदी आंध्रप्रदेश मध्ये प्रवेश करते. तत्पूर्वी सीमेवर तिला उजव्या बाजूने किन्नरसानी नदी येऊन मिळते.आंध्रप्रदेशमध्ये आल्यावर गोदावरीचा प्रवास पूर्व घाटाच्या पट्ट्यातून होतो. घाटातील पापी टेकड्या पार करण्यापूर्वी गोदावरी नदीला ओडिशा आणि छत्तीसगढमधून वाहत आलेली शबरी नदी डाव्या बाजूने येऊन मिळते. आंध्रात गोदावरी नदी ही पूर्व गोदावरी आणि दक्षिण गोदावरी या दोन जिल्ह्यांची सीमा बनून वाहते. पुढे पूर्वघाटात गोदावरी पापीकोंडल घळईतून वाहते. पूर्वघाटादरम्यान गोदावरीचे पात्र अरुंद होते. पूर्व घाट ओलांडताच गोदावरी पुन्हा विस्तृत होते. पूर्व गोदावरी जिल्ह्यातील राजमहेंद्री येथे गोदावरी नदी दोन शाखेत अर्थात दोन वितरिकेत विभागली जाते. त्या वितरिका म्हणजे गौतमी गोदावरी आणि वशिष्ठ गोदावरी होय. गौतमी गोदावरीला वृद्ध गोदावरी असे सुद्धा म्हणतात. गोदावरीच्या या दोन वितरिकेतून पुन्हा प्रत्येकी एकेक वितरिका वेगळी होऊन वाहते. वशिष्ठ गोदावरीतून वैनतेय तर गौतमी गोदावरीतून निलारेऊ नावाच्या वितरिका वेगळ्या होतात. गौतमी गोदावरी ही पूर्व गोदावरी जिल्ह्यातील मात्र राजकीय दृष्ट्या पुद्दुचेरीचा भाग असलेल्या यानम येथे, तर निलारेऊ गोदावरी ही मुल्लापलेम येथे बंगालच्या उपसागराला जाऊन मिळते. तसेच वशिष्ठ गोदावरी नदी पूर्व गोदावरी जिल्ह्यातीलच अंतरवेदी येथे बंगालच्या उपसागराला जाऊन मिळते, तर वैनतेय गोदावरी वोडलरेऊ येथे समुद्राला जाऊन मिळते. अशाप्रकारे गोदावरीचे चार प्रवाह मिळून बंगालच्या उपसागरानजीक १७० किमीचा त्रिभुज प्रदेश तयार करतात. हा त्रिभुज प्रदेश जैवविविधतेच्या दृष्टीने समृद्ध प्रदेश म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्र, तेलंगणा आणि आंध्रप्रदेश असा तीन राज्यातील १४६५ किमीचा प्रवास संपवून नव्हे तर तीन राज्यांना समृद्ध करून गोदामाय बंगालच्या उपसागराला कडाडून मिठी मारत कायमची विलीन होते, तेही कसलाही लोभ न ठेवता....

## योगवर्गाचे आयोजन

शिवाजी पेठ, मंगळवार पेठ, महाद्वार रोड, अंबाबाई मंदिर परिसरातील नागरिकांसाठी योग विद्याधाम, कोल्हापूर आणि कोल्हापूर चित्पावन संघ यांचे संयुक्त सहकार्याने कोल्हापूर चित्पावन संघ हॉल, गुरुमहाराज वाड्यानजीक, मिरजकर तिकटी, कोल्हापूर येथे रोज सकाळी ६ ते ८ या वेळेत योगासन वर्ग सुरू झाले आहेत. तरी इच्छुक योगसाधकांनी सदर वर्गाचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी खालील नंबरवर संपर्क साधावा.

**सौ. सिद्धी बकरे - 8275606627,**
**श्री. रोहित गवळी - 9657963475**

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते**
**चित्पावन संघाच्या कार्यालयात**
**समक्ष / फोन / पत्राद्वारे / व्हॉटस् ॲपद्वारे**
**लवकरात लवकर कळवावेत.**

### ब्राह्मण समाज ‘अभिमानास्पद व्यक्ती गौरव !’

# महादेव काशिनाथ गोखले



पुण्याच्या पेठांमध्ये असले अचाट भिडू राहून गेले आहेत की आज त्यांचे किस्से सांगितले तर लोकांना ते दंतकथा वाटतात. असेच एक आजोबा पेरूगेट पोलीस चौकीजवळ साठ वर्ष पेपर विकायचे. टिपिकल पांढरा शर्ट, चड्डी, तोंडावर कधी एकदा तुमचा अपमान करू असे भाव, काटक शरीर. आता त्यांचं वैशिष्ठ्य काय अस तुम्ही विचाराल तर त्याची लाईन खूप मोठी आहे, ऐकून तुम्हाला दम भरेल.

- नाव — महादेव काशिनाथ गोखले,
- जन्म — १९०७ साली झाला असावा.
- राहायला — सदाशिव पेठ, पुणे.
- शिक्षण — चौथी
- व्यवसाय — बुक बाईंडींग व वर्तमानपत्र विकणे.
- छंद — अचाट गोष्टी करणे.

आता परवा पर्यंत, म्हणजे २०१० पर्यंत, ते भरत नाट्यमंदिर जवळच्या एका छोट्याशा दुकानात दिसायचे. म्हणजे काय तर टिळकांच्या काळापासून ते मनमोहनसिंग यांचा काळ त्यांनी जवळून पाहिला. महादेव गोखलेंना बाबुराव म्हणून ओळखत. तर हे बाबुराव रोज पहाटे ३.३० वाजता उठायचे. पेरूगेटजवळच्या आपल्या घरापासून धावायला सुरू करायचे ते थेट कात्रजमार्गे खेड-शिवापूर, तिथून डायरेक्ट सिंहगड मग परत खडकवासला मार्गे पुण्यात पेरूगेटच्या दुकानात ९ च्या ठोक्याला हजर. हा दिनक्रम वयाच्या २१ व्या वर्षी सुरू झाला ते ९० वर्षापर्यंत सुरूच होता. सहज म्हणून घरातून फिरायला निघायचे आणि लोणावळ्याला जाऊन यायचे तेही पायी. शीर्षासन करून फक्त दोन्ही हातावर पर्वती चढायचे तर कधी पाठमोरं चढायचे. आपल्या बायकोला पाठंगुळीवर घेऊन पर्वती चढायचा विक्रम तर ४३ वेळा त्यांनी केला होता.

आता एवढा व्यायाम असेल तर खुराक पण तसाच हवा नां राव. नव्वद वर्ष पूर्ण केल्यावरही एकावेळी ९० जिलेब्या पैजेवर सहज फस्त करायचे. त्यांचे एक मित्र होते साताऱ्याचे तुळशीराम मोदी. ते त्यांना सकाळच्या नाश्त्याला खास एक किलो कंदी पेढे पाठवून द्यायचे. पुण्याच्या सुप्रसिद्ध काका हलवाई दुकानातून रोज एक किलो पेढे त्यांच्या घरी पोहचवले जायचे.

या अचाट भिडूच्या स्कीलचा वापर कोणी केला नसता तर नवल. स्वातंत्र्यापूर्वीचा काळ होता. तेव्हा त्यांनी क्रॉसकंट्री मॅरेथोन स्पर्धेत २५७ मेडल मिळवले होते. त्यांची कीर्ती ऐकून ४ ब्रिटिश अधिकारी त्यांच्याकडून ऑलिम्पिकसाठी ट्रेनिंग घ्यायचे. फावल्या वेळात त्यांना मराठी, हिंदी शिकवायचे. पुढे त्यांना साठे बिस्कीट कंपनीमध्ये नोकरी लागली. साठे बिस्कीटचे मुख्यालय होते कराचीला. तर बाबुरावांना

पावसाळ्याचे ४ महिने सोडले तर कराचीला आठ महिने नोकरीसाठी राहावं लागायचं. पण तिथेही त्यांची अंगातली रग शांत बसायची नाही.

कराची-पुणे हा प्रवास ते सायकलवरून करायचे. तिथूनच त्यांनी मानसरोवरला सायकलप्रवास देखील केला होता. पुण्यात असताना त्यांना बालगंधर्वांच्या गाण्याची आवड निर्माण झाली होती. ते स्वतः उत्कृष्ट तबला वाजवायचे.(आता बास की किती काय करणार) मग बालगंधर्वांची गाणी ऐकण्यासाठी त्यांच्या कार्यक्रमाचा डोअरकीपर म्हणूनही नोकरी केली होती. तिथे त्यांची सगळी गाणी पाठ झाली.

पुढे कराचीला आल्यावर सुप्रसिद्ध अभिनेत्री नर्गिसची आई म्हणजेच जद्दनबाई, बेगम आरा या त्याकाळच्या सर्वोत्तम गायिका गोखल्यांकडून गंधर्व स्टाईलचं गाण शिकण्यासाठी येत. त्यांची कीर्ती बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड यांच्यापर्यंत पोहचली. बाबुराव गोखलेंना त्यांनी बडोद्याला प्रिंटिंग शिकवण्याच्या नोकरीवर ठेऊन घेतलं. पण खरा उद्देश त्यांच्या धावण्याला वाव देणे हा होता.

१९३६ साली जेव्हा बर्लिनमध्ये ऑलिम्पिक होणार होते तेव्हा बडोद्याच्या महाराजांना हिटलरचे खास निमंत्रण होते. सयाजीराव जर्मनीला आपल्या सोबत बाबुराव गोखल्यांना घेऊन गेले. स्पर्धेदरम्यान गोखल्यांची हिटलरशी ओळख करून दिली. अनवाणी रोज ६०-७० किलोमीटर धावणाऱ्या या अवलिया धावपटूवर हिटलर फुल इम्प्रेस झाला.

त्याने गोखल्यांना जर्मनीत काही दिवस ठेवून घेतले. त्यांचा पाहुणचार केला होता. हिटलरशी त्याकाळात त्यांची चांगली मैत्री झाली होती. पुढे ते जेव्हा लंडनला गेले तेव्हा त्यांच्या स्वागतासाठी त्यांचे जुने शिष्य व तेव्हाचे गव्हर्नर स्वतः आले. हे बघून बडोद्याचे महाराजसुद्धा आश्चर्यचकित झाले होते.

असा हा अवलिया माणूस. तारुण्यात गंमत म्हणून घरात चित्ता, अजगर असे प्राणी पाळायचा. टिळकांचे नातू म्हणजेच माजी विधानसभा अध्यक्ष जयंतराव टिळक हे त्यांचे खास मित्र. त्यांच्यासोबत अनेकदा शिकारीसाठी रानोमाळ भटकन्ती केली होती. स्वातंत्र्यानंतर मात्र स्वतःचं पेपरविक्री आणि बुक बाईंडिंगच छोटसं दुकान उघडलं आणि आयुष्यभर ते संभाळलं.

जवळपास १०३ वर्ष जगले. रोज जेवणाला १५ भाकऱ्या खाल्ल्या. आणि हे त्यांच्या शरीरयष्टीकडे बघून जाणवायचं देखील नाही. आयुष्यात एकदाही दवाखान्याचे तोंडही बघितलं नाही. त्यांच्या मृत्यू नंतर मेडिकल सर्टिफिकेट कुठून आणायचं हा प्रश्न त्यांच्या लेकीला आणि जावयला पडला होता.

ही कथा वाचली तरी आपल्याला वाटेल भिडू आपल्याला थापा मारतोय. मात्र आजही पेठेत गेले तर अनेक जण त्यांनी केलेल्या वेगवेगळ्या पराक्रमाचे साक्षीदार सापडतील.

२००१ साली त्यांना प्रसिद्ध योगगुरु बी.सी. अय्यंगार, ज्येष्ठ गायिका धोंडूताई कुलकर्णी, संस्कृत पंडीत लक्ष्मणशास्त्री शेंडे यांच्यासोबत पुण्याचा मानाचा शारदा ज्ञानपीठ सन्मान देण्यात आला.

सुप्रसिद्ध सूत्रसंचालक सुधीर गाडगीळ यांनी त्यांच्या मृत्यूनंतर एका वर्तमानपत्रात श्रद्धांजलीपर लेख लिहिला होता त्यात या सगळ्याचा उल्लेख केला आहे.

* * *

**असामान्य ज्ञान**

- गरम पाणी गार पाण्यापेक्षा लवकर गोठते.
- मोनालिसाच्या चित्राला 'भुवया' नाहीत.
- 'The quick brown fox jumps over the lazy dog' ह्या इंग्रजी वाक्यात सर्व इंग्रजी अक्षरे आली आहेत.
- 'जीभ' हा आपल्या शरीरातील सर्वात जास्त मजबूत स्नायू आहे.
- मुंग्या अजिबात झोपत नाहीत.
- 'I am' हे इंग्रजीतील सर्वात संक्षिप्त नि पूर्ण वाक्य आहे.

**- प्रकाश कोठारी**

# कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलींची माहिती - ऑगस्ट २०२२)

| अ. क्र. | वधूचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | धनश्री --- | देशस्थ(यजु) विधवा मुलीसह | १६/७/८५ ५.० | गौतम, मिथुन आर्द्रा, द्वितीय आद्य, मनुष्य | B.A.B.Ed. Sangeet Visharad Harmo. Dip | संगीताचे क्लास | मा.प्रा. १५,०००/- | धनश्री समीर आण्णीगेरी (जोशी) हनुमान नगर पाचगांव, कोल्हापूर.८६२४९५९७८३ |
| २. | अमृता --- | देशस्थ | २८/२/८६ ५.६ | शांडिल्य,तूळ चित्रा, ३ रे मध्य | M.Com. GDC&A | पुणे येथे नोकरी | मा.प्रा. --- | अशोक देशपांडे सोलापूर ९५५२८८६४४६ |
| ३. | वैशाली --- | देशस्थ यजुर्वेदी | ७/३/८७ ५.३ | काश्यप, वृषभ रोहिणी, ४ थे मनुष्य, आद्य | B.E. Compu. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ७ लाख | वैशाली श्रीकांत जोशी रा. खटाव ९६६५०२१८१६ |
| ४. | गायत्री --- | देशस्थ | १९/११/८८ ५.७ | वसिष्ठ, मीन उ.भाद्रपदा,३रे मनुष्य | M.Com. GDC&A | --- | मा.प्रा. --- | रामचंद्र कुलकर्णी रा. माढा ९८६००३०३८७ |
| ५. | स्नेहलता --- | देशस्थ | ११/३/८९ ५.७ | पाराशर, मेष भरणी, ४ थे मध्य, मनुष्य | M.E. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. १३ लाख | संजय जोशी पुणे. ९४२०६६००१७ |
| ६. | राधिका B -ve | देशस्थ(ऋ) | २१/११/९१ ५.१ | कौशिक, मेष भरणी, तिसरे मध्य, मनुष्य | M.C.A. Sangeet Visharad | --- | --- | सौ.मंजुश्री मोरेश्वर कुंभोजकर शिवाजी पेठ, कोल्हापूर ७५८८२५५९३१ |
| ७. | मृण्मयी --- | देशस्थ(ऋ) | ६/३/९२ ५.३ | जमदग्नीवत्स,मीन उ.भाद्रपदा,३रे मध्य, मनुष्य | B.E. Computer C-DAC | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. १२ लाख | गोविंद खुपेरकर गेंदामल, शाहूपुरी,सातारा ९४२२०३८६३० |
| ८. | सुप्रिया A +ve | देशस्थ | १२/२/९३ ५.६ | काश्यप, तूळ स्वाती, २ रे अंत्य, देवगण | B.E. Computer | नोकरी | मा.प्रा. २५,०००/- | रामचंद्र केशव जोशी मु.पो.फोंडाघाट,कणकवली ९४२१२६६८७१ |
| ९. | पूजा AB +ve | देशस्थ | १८/३/९४ ५.४ | गौतम, वृषभ कृतिका, चौथे अंत्य, राक्षस | B.E. E & TC | पुणे येथे नोकरी | मा.प्रा. १६,०००/- | रविंद्र विठ्ठल कुलकर्णी सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर ७८७५०५८३८५ |
| १०. | आदिती B +ve | देशस्थ(ऋ) | १४/९/९५ ५.३ | काश्यप, वृषभ कृतिका, ३ रे अंत्य | B.E. Electrical | सरकारी नोकरी | वा.प्रा. १२ लाख | आदिती गजानन सांगरुळकर धनकवडी, पुणे. ९९२२४४३६२६ |

**शांभवी नितीन शुक्ल**
**(देशस्थ)**
(O +ve)

**जन्मतारीख :** १९/५/९५
**शिक्षण :** B.Com. German Lang.
**नोकरी :** Inbetween Jobs
**मा.प्रा. :** १६,०००/- **उंची :** ५.५
**पत्ता : श्री. नितीन शुक्ल**
हनुमान नगर, पाचगांव रोड, कोल्हापूर
मोबा.9422582200, 9423815959
**अपेक्षा :** अनुरुप (उंची कमीतकमी ५.७) निर्व्यसनी, सुस्वभावी, समजूतदार, पुणे

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| विश्वामित्र | मकर | उत्तराषाढा | ४ थे | अंत्य | मनुष्य |

**उत्कर्षा सूर्यकांत कुलकर्णी**
**(देशस्थ)** (O +ve)
**शिक्षण :** M.Sc. B.Ed.

**जन्मतारीख :** १२/१२/१९९५
**नोकरी :** शांतिनिकेतन शाळा, कोल्हापूर येथे
**वा.प्रा. :** २ लाख **उंची :** ५ फूट
**पत्ता : श्री. सूर्यकांत विठ्ठल कुलकर्णी**
शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर.
मोबा. ९७६७९७०७६९, ९०४९५३२७५१
**अपेक्षा :** मास्टर डिग्री, वेल सेटल

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| जमदग्नी | कर्क | आश्लेषा | २ रे | अंत्य | राक्षस |

# कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलांची माहिती - ऑगस्ट २०२२)

| अ. क्र. | वराचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विक्रांत B +ve | देशस्थ | १६/१०/८३ ५.५ | काश्यप, मकर, धनिष्ठा, प्रथम मध्य, राक्षस | B.Com. MSCIT | कुशिरे कोल्हापूर येथे | मा.प्रा. ३५,०००/- | कल्पना अरविंद शेवडे आयटीआय जवळ, कोल्हापूर ९१३०६१७७७५ |
| २. | प्रसाद A +ve | देशस्थ | २३/७/८४ ५.३ | काश्यप, मेष, कृतिका, प्रथम अंत्य, राक्षस | B.Com. | ज्योतिष व हेमकिरण डेव्ह.सांगली | वा.प्रा. ३.६० लाख | मधुकर जोशी मु.पो.कसबे डिग्रज,सांगली. ९०२२४०१७४४ |
| ३. | किरण A -ve | देशस्थ | १६/११/८५ ५.५ | विश्वामित्र, धनु पूर्वाषाढा, तिसरे मध्य, मनुष्य | B.Com. MBA Finance | कोल्हापूर येथे व्यवसाय | मा.प्रा. ५०,०००/- | किशोर दत्तात्रय डंके सम्राटनगर, कोल्हापूर ९०६७१८४३५३ |
| ४. | श्रीकांत A +ve | देशस्थ (घटस्फोटीत) | ९/१०/८६ ५.११ | काश्यप, धनु मूळ, तृतिया आद्य, राक्षस | B.E. | आय.बी.एम. पुणे येथे नोकरी | वा.प्रा. २० लाख | गोविंद लक्ष्मण जोशी राधानगरी रोड, कोल्हापूर ९५६१५८३७०१ |
| ५. | समीर B +ve | कोकणस्थ | ८/२/८७ ५.६ | काश्यप, वृषभ मृग, पहिले मध्य, देवगण | B.Tech. M.B.A. | ओगलेवाडी येथे नोकरी | वा.प्रा. ६ लाख | सुनंदा सुरेंद्र लेले विद्यानगर, कराड ८०८७२४३७०६ |
| ६. | मंदार A +ve | देशस्थ | ११/६/८८ ५.१० | वशिष्ठ, मेष भरणी, दुसरे मध्य, मनुष्य | B.E.(IT) LLB (Sp.) | ॲडव्होकेट इचलकरंजी येथे | वा.प्रा. ६ लाख | श्रीधर कुलकर्णी गावभाग, इचलकरंजी ९८५०९२८०५५ |
| ७. | संदेश A + ve | देशस्थ | १८/३/८९ ५.७ | श्रीवत्स, कर्क अश्लेषा, तिसरे अंत्य, राक्षस | M.B.A. | विमाननगर पुणे येथे नोकरी | मा.प्रा. ४०,०००/- | सुधाकर केशवराव सोनीकर सांगाव, जि.कोल्हापूर ९४०४९९०९५६ |
| ८. | बन्सी A + ve | देशस्थ(ऋ) | ५/६/९० ५.५ | जमदग्नी, तूळ स्वाती, चतुर्थ अंत्य, देवगण | D.M.E. | स्वत:चा व्यवसाय | मा.प्रा. ५०,०००/- | ब्रह्मानंद नारायण कुलकर्णी रुकडी, कोल्हापूर ७७७५८४८८२० |
| ९. | अक्षय --- | देशस्थ | ११/४/९१ ५.९ | कुंभ शततारका, ४थे आद्य, राक्षस | B.E. (Eletct) MBA | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. १० लाख | अक्षय दत्तात्रय जोशी रा.तासगाव, सांगली ९५५२०४४५६३ |
| १०. | आदित्य O +ve | देशस्थ | २४/८/९२ ५.७ | भारद्वाज, मिथुन आर्द्रा, द्वितीय, आद्य, मनुष्य | B.E. Electr. C.Dac | बँक ऑफ अमेरिका गुजरात | वा.प्रा. ११ लाख | अनिल गोविंद कुलकर्णी ताराबाई पार्क, कोल्हापूर ९६०४११२४४० |

**प्रथमेश प्रदीप बादरायणी**
(AB +ve)

**जन्मतारीख :** ४/६/१९९७
**शिक्षण :** B.C.A., M.C.A.
**नोकरी :** TCS, Pune
**वा.प्रा. :** ७ लाख **उंची :** ५.६
**पत्ता : श्री. प्रदिप बादरायणी**
बावधन, पुणे.
मोबा. 9890865857, 8482988627
**अपेक्षा :** सुस्वभावी, मनमिळावू व करियर ओरिएंटेड असावी

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| वशिष्ठ | वृषभ | कृतिका | ४ थे | अंत्य | राक्षस |

**मनिष पुरुषोत्तम लाटकर**
देशस्थ (B +ve)

**जन्मतारीख :** १९/१०/१९९२
**शिक्षण :** T.Y.B.A. IT Course
**व्यवसाय :** हक्कदार पुजारी श्रीमहालक्ष्मी
**वा.प्रा. :** ३ लाख **उंची :** ५.११
**पत्ता : श्री. पुरुषोत्तम लाटकर**
2752, ए वॉर्ड, वांगी बोळ, कोल्हापूर.
मोबा. 8956594343, 9595904799
**अपेक्षा :** मनमिळावू, सुस्वभावी, एकत्र कुटुंबामध्ये सांभाळून घेणारी.

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| गार्ग्य | कुंभ | शततारका | प्रथम | आद्य | राक्षस |

### कोल्हापूर चित्पावन संघाच्या वतीने

# श्री महालक्ष्मी अष्टमी जागर सोहळा

प्रतिवर्षाप्रमाणे कोल्हापूर चित्पावन संघातर्फे श्री महालक्ष्मी अष्टमी जागर सोहळा रविवार, दि. २ ऑक्टोबर २०२२ रोजी ब्राह्मण सभा करवीर, मंगलधाम, बिनखांबी गणेश मंदीरजवळ, श्री महालक्ष्मी मंदीर दक्षिण दरवाजा, कोल्हापूर येथे आयोजित केला आहे. यामध्ये पूजा, महाप्रसाद, श्री देवी मूर्ती प्रतिष्ठापना व दर्शन सायंकाळी ७ नंतर घागरी फुंकणे असा नियोजित कार्यक्रम होणार आहे. या सोहळ्यास पूजेसाठी येणाऱ्या वशेळ्यांनी दि. २९ सप्टेंबर, २०२२ पूर्वी नोंदणी करणे आवश्यक आहे. श्री महालक्ष्मी अष्टमी जागर सोहळ्याच्या प्रसादासाठी येणाऱ्या भक्तांनी दि. २९ सप्टेंबर २०२२ पूर्वी नोंदणी करावी. वशेळ्यांनी सकाळी ठीक ८ वाजता मंगलधाम सभागृहात येणेचे आहे. प्रसादाची वेळ दुपारी १२ ते ३ पर्यंतच आहे. भाविकांसाठी दर्शन वेळ सायंकाळी ७ ते रात्री ९ पर्यंतच ठेवली आहे. प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेऊन प्रसंगानुरूप आवश्यक ते बदल होऊ शकतात. संबंधितांनी आधिक माहितीसाठी संघाच्या कार्यालयीन वेळेत ०२३१-२५४६२२५/२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५ या नंबरवर संपर्क करावा असे आवाहन संघाचे अध्यक्ष श्री. नंदकुमार मराठे व कार्यवाह श्री. केदार जोशी यांनी केले आहे.

## श्री महालक्ष्मी अष्टमी जागर सोहळ्याचे लाईव्ह प्रक्षेपण

कोल्हापूर चित्पावन संघातर्फे मागील वर्षापासून नवीन उपक्रम सुरू केला आहे. अनेक भक्तांना केवळ प्रत्यक्ष दर्शन काही कारणांमुळे मिळत नाही. शिवाय आपले ज्ञाती बांधव केवळ भारतातच नाही, तर परदेशातही वास्तव्यास असतात. सर्व भक्तांना हा सोहळा घरी पाहता यावा यासाठी मागील वर्षापासून श्री अष्टमी सोहळ्याचे सायंकाळी फेसबुकवरून लाईव्ह दाखविण्याची मोफत सोय केली आहे. संघाच्या फेसबुक पेजवरून हा सोहळा सर्व भक्तांना पाहता येणार आहे. जास्तीत जास्त भक्तांनी याचा लाभ घ्यावा व आपल्या प्रतिक्रिया नोंदवाव्यात.

## घरपोच प्रसाद योजना

स्थानिक किंवा परगावी असणाऱ्या भक्तांना घरपोच प्रसाद पाठवण्याची व्यवस्था संघाने केली आहे. यासाठी अभिषेक व प्रसाद दक्षिणा केवळ रु. ३५१/- संघाच्या अधिकृत कार्यालयात किंवा संघाच्या पत्त्यावर मनिऑर्डर किंवा बँक ट्रान्स्फर/ गुगल पे यापैकी कोणत्याही माध्यमातून पाठवावेत. नोंदणी फॉर्म आपल्याला व्हॉटस् ॲपवर पाठवला जाईल. त्यासाठी आपला व्हॉटस् ॲप नंबर संस्थेच्या ७६२०५४६२२५ या नंबर वर कळवावा. आपला संपूर्ण पत्ता व व्हॉटस् ॲप नंबर कळवल्यास आपल्याला घरपोच श्रींचा प्रसाद पाठवणे सोयीचे होईल. जास्तीत जास्त भाविकांनी या 'घरपोच प्रसाद योजनेचा' लाभ घ्यावा.

आपले स्नेहांकित,

| नंदकुमार मराठे | केदार जोशी | प्रसाद भिडे |
|---|---|---|
| (अध्यक्ष) | (सहकार्यवाह) | (उपाध्यक्ष) |
| ०२३१-२५४१८२३ | ७५८८८३९५२७ | ९८२२२४८५०० |

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :** info@shogini.com

**Visit us at :** www.shogini.com


**PRINTED BOOK**

प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.